



# गोदातीर समाचार

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com
RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026





* वर्ष ६४ वे * अंक ११५ * नांदेड * गुरूवार, दि. १ मे २०२५ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211




**नांदेड** : जगत्ज्योती महात्मा बसवेश्वर यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. भाजपच्यावतीने माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण, खा. डॉ. अजित गोपछडे, संघटनमंत्री संजय कौडगे, माजी आ. अमरनाथ राजूरकर, प्रविण साले, चैतन्यबापू देशमुख, मिलिंद देशमुख, दिलीप कंदकुर्ते, संतोष पांडागळे, शैलजा स्वामी, राजू काळे, अमितसिंह तेहरा, विपूल मोळके, विजय होकर्णे, महादेवी मठपती, डॉ. शीतल भालके, अपर्णा नेरलकर, लक्ष्मी वाघमारे, विजय गंभीरे आदी दिसत आहेत. दुसऱ्या छायाचित्रात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्यावतीने महात्मा बसवेश्वर यांना अभिवादन करण्यात आला. यावेळी आ. प्रतापराव पाटील चिखलीकर, माजी आ. ओमप्रकाश पोकर्णा, आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, रामदास पाटील सुमठाणकर, जिल्हाध्यक्ष दिलीपराव धर्माधिकारी, ॲड. मुक्तेश्वर धोंडगे, माधव पावडे, बालाजी शिंदे, कन्हैया कदम, मोहसीन खान पठाण, माधव चिंचाळकर, संतोष दगडगावकर, माधव चिंचाळे, रमेश गांजापूरकर आदी दिसत आहेत. तिसऱ्या छायाचित्रात शिवा अखिल भारतीय संघटनेच्यावतीने शहरातून महात्मा बसवेश्वर यांच्या जयंतीनिमित्त मिरवणूक काढण्यात आली. यावेळी संस्थापक अध्यक्ष प्रा. मनोहर धोंडे, गिरधर पाटील डाकोरे, सुनील शेट्टे, शिवकुमार देशमुख, वैजनाथ तोनसूरे, विठ्ठल ताकबिडे, संजय कोटाळे, संभाजी पावडे, विलास कापसे, संभाजी पाटील बुड्डे, रवी पांडागळे, गजानन कानडे आदी दिसत आहेत. (छाया : करणसिंह बैस, ज्ञानेश्वर सुनेगावकर)

गोदातीर समाचार



आज महाराष्ट्र दिन व कामगारदिन. त्यानिमित्त सर्वांना हार्दिक शुभेच्छा!

–संपादक

**सुट्टीची सूचना**

आज महाराष्ट्रदिन व कामगार दिनानिमित्त कार्यालयास सुट्टी असल्याने उद्या दि. २ मे २०२५ चा गोदातीर समाचारचा अंक प्रकाशित होणार नाही. वाचक, जाहिरातदार, एजंट यांनी याची नोंद घ्यावी.

– व्यवस्थापक

# जातनिहाय जनगणना होणार, केंद्र सरकारचा निर्णय

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** केंद्र सरकारच्या कॅबिनेट मीटिंग ऑन पॉलिटकल अफेअर्सच्या बैठकीत मोठा निर्णय घेतला गेला आहे. गेल्या काही वर्षांपासून देशभर चर्चेत असलेल्या जातनिहाय जनगणनेचा निर्णय घेण्यात आला आहे. मोदी सरकारनं येत्या काळात जातनिहाय जनगणना करण्याचा निर्णय घेतला आहे. केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी या निर्णयासंदर्भातील माहिती दिली. जातनिहाय जनगणनेच्या निर्णयाचं स्वागत काँग्रेसकडून देखील करण्यात आलं आहे.

भारतात दर दहा वर्षांनी जनगणना केली जाते. २०२१ ला जनगणना होणं अपेक्षित होतं, मात्र त्यावेळी करोना संसर्गामुळं जनगणना करण्यात आली नव्हती. आता यापुढं जी जनगणना होईल ती जातनिहाय जनगणना असेल. केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी या निर्णयाची माहिती देताना जातनिहाय जनगणनेसंदर्भातील माहिती देताना काँग्रेसवर देखील टीका केली. काँग्रेसनं केवळ सर्वेक्षण करुन घेतल्याचं म्हटलं आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या अध्यक्षतेखालील कॅबिनेट मीटिंग ऑन पॉलिटिकल अफेअर्सच्या बैठकीत जातींच्या गणनेचा आगामी जनगणनां मध्ये समावेश केला जाईल, अशी माहिती केंद्रीय माहिती व प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिली आहे. आगामी बिहार विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारचा हा मोठा निर्णय मानला जात आहे.

अश्विनी वैष्णव म्हणाले की, १९४७ नंतर जातनिहाय जनगणना करण्यात आली नाही. काँग्रेसनं जातनिहाय जनगणनेऐवजी जातनिहाय सर्वेक्षण केलं. यूपीए सरकारच्या काळात काही राज्यांनी राजकीय दृष्टीकोनातून जातनिहाय सर्वेक्षण केल्याचं ते म्हणाले.

जातनिहाय जनगणना मूळ जनगणनेत समाविष्ट झाली पाहिजे. नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कॅबिनेट अफेअर्सच्या बैठकीत जात निहाय जनगणनेला आगामी काळातील जनगणनेत समाविष्ट केलं जाईल. जातनिहाय जनगणना काँग्रेस आणि इंडिया आघाडी आपल्या लाभापर्यंत मर्यादित ठेवत होत, असंही केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी म्हटलं आहे.

सुप्रीम कोर्टात या सरकारनं जातनिहाय जनगणना करु शकत नाही असं प्रतिज्ञापत्र सादर केलं होतं. आता कॅबिनेट मीटिंग ऑन पॉलिटिकल अफेअर्सच्या बैठकीत जातनिहाय जनगणना करु असं म्हणत आहेत. बिहार विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेतला गेला आहे, असं प्रकाश आंबेडकर म्हणाले.

केंद्र सरकारनं जर हा निर्णय घेतला असेल तर स्वागत आहे. हा निर्णय प्रचाराच्या पातळीवर न राहता त्याची अंमलबजावणी करण्यात यावी. यासोबत आरक्षणाची मर्यादा वाढवण्यात यावी, अशी मागणी देखील हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे. संघानं आगामी काळात त्यांचा सरसंघचालक ओबीसी समाजातील करावा, असं देखील हर्षवर्धन सपकाळ म्हणाले. सर्वांचा समावेश व्यवस्थेत असावा ही भूमिका आणि भावना आहे, असं हर्षवर्धन सपकाळ म्हणाले.

# शहरात महात्मा बसवेश्वर जयंती साजरी

## लोकप्रतिनिधींसह बसवप्रेमींनी केले अभिवादन

**नांदेड (प्रतिनिधी)–** जगत्ज्योती महात्मा बसवेश्वर यांची जयंती बुधवार, दि. ३० एप्रिल रोजी उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी बसवेश्वर महाराज प्रेमींसह लोकप्रतिनिधींनी नवीन कौठा येथील पुर्णाकृती पुतळ्यास अभिवादन केले. यानिमित्ताने शहरात महात्मा बसवेश्वर सामाजिक एकता दौड व रक्तदान शिबीर यासह विविध उपक्रम राबविण्यात आले.

जगत्ज्योती महात्मा बसवेश्वर यांच्या जयंतीनिमित्त शहरात उत्साहाचे वातावरण दिसून आले. सकाळपासूनच कौठा येथील पुर्णाकृती पुतळ्यास अभिवादन करण्यास बसवेश्वर प्रेमींची रिघ लागली होती. सायंकाळपर्यंत ही रिघ सुरूच होती. महात्मा बसवेश्वर यांच्या पुतळ्यास कृतज्ञतेने अभिवादन करून, त्यांच्या समता, बंधुता आणि कर्मयोगाच्या विचारांना मान्यवरांनी उजाळा दिला.

यावेळी माजी मुख्यमंत्री खासदार अशोकराव चव्हाण, खा. डॉ. अजित गोपछडे, खासदार प्रा. रविंद्र चव्हाण, आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर, आमदार बालाजी कल्याणकर, आमदार आनंद बोंढारकर, भाजप मराठवाडा विभागीय संघटनमंत्री संजय कौडगे, माजी आमदार महानगर कार्याध्यक्ष अमर राजूरकर, प्रवीण साले, ॲड. चैतन्यबापू देशमुख, मिलिंद देशमुख, भाजप प्रवक्ते संतोष पांडागळे आदींसह अनेक मान्यवरांनी अभिवादन केले. जयंतीनिमित्त रक्तदान एकता दौड आणि रक्तदान शिबीर घेण्यात आले. अन्नदानासह विविध समाजपयोगी उपक्रम राबविण्यात आले. शेवटी रक्तदान शिबीर व एकता दौडमधील विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले. नवीन कौठा परिसरात जयंतीनिमित्त नागरिकांनी मोठी गर्दी केली होती.

# आयपीएल सट्टा खेळणाऱ्यांविरुद्ध स्थानिक गुन्हे शाखेची जिल्हाभरात कारवाई; २५ आरोपींना अटक

**नांदेड (प्रतिनिधी)–** आयपीएल क्रिकेटवर सट्टा लावणाऱ्या जुगाऱ्यांविरुद्ध कडक कारवाईच्या सूचना मिळाल्यानंतर स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय व त्यांच्या सहकाऱ्यांनी जिल्हाभरात वेगवेगळ्या ठिकाणी कारवाया करून जवळपास २५ जुगाऱ्याना अटक केली आहे. या कारवायामध्ये स्थानिक गुन्हे शाखेने दहा, वजिराबाद पोलिसांनी दोन तर देगलूर पोलिसांनी एक कारवाई केली आहे. या कारवायांमध्ये दोन लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय यांनी आपले सहकारी अधिकारी पोलीस उपनिरीक्षक मिलिंद सोनकांबळे, आशिष बोराटे, साईनाथ पुयड, महेश कोरे, आनंद बिचेवार आणि तुकडे व अंमलदार यांची ४ पथके तयार करून आयपीएल सट्टा चालविणाऱ्यांविरूध्द माहे ३ मार्च २०२५ ते दि. ३० एप्रिल २०२५ पर्यंत वजिराबाद, नांदेड ग्रामीण, उमरी, लोहा, मरखेल, देगलूर आणि माहूर ठाण्यात असे एकूण १३ गुन्हे दाखल करून एकूण २५ आरोपींविरूध्द कारवाई करून त्यांच्याकडून १ लाख ९२ हजार २३० रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.

जिल्ह्यात कोणत्याही प्रकारचे अवैध व्यवसाय व आयपीएल क्रिकेट सट्टा चालत असल्यास उदय खंडेराय यांच्या मोबाईल क्रमांक ८३७८८०३००४ वर माहिती द्यावी असे आवाहन पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी केले आहे.

**सट्टा प्रकरणातील आरोपींची नावे**

हरजितसिंघ पुरणसिंघ चुंग रा.बाबादीपनगर नांदेड., अंकुश नारायणसिंह चौहाण रा. पटेल कॉलनी धर्माबाद, साईनाथ पवार रा.धर्माबाद, राजू गोणारे रा. धर्माबाद, संतोष सुभाष कडपे रा. सराफा लाईन नांदेड, विक्रम बसंतराव बिडवई रा. शिवाजीनगर नांदेड, विजय यादव रा. गाडीपुरा नांदेड, अमोल घंटाजी कटलवार रा. गोकुळनगर देगलुर, सुरेश रेड्डी रा.मरखेल ता. देगलुर, अक्षय प्रविणकुमार अग्रवाल रा.उमरी, गणेश श्यामसुंदर भारूका रा.उमरी, बल्लूराम भरतलाल फत्तेलष्करी रा. रामनगर, नांदेड, प्रवीण पद्माकर देशमुख रा.मरखेल, सचिन धुमाळ रा.मरखेल ता. देगलूर, विष्णू विजय जोशी रा. शिवाजीनगर धर्माबाद, गोविंद गंगाधर बोमलावार रा. राजापूर धर्माबाद, गंगाधर घंटे रा. धर्माबाद, शेख वाजीद रा. धर्माबाद, संदीप पाटील रा. धर्माबाद, माधव चिंचोलकर रा.धर्माबाद, बालाजी विश्वनाथ चुडावकर रा.लोहा, सुनील माधवराव थडके रा.देगाव ता. देगलूर, किरण पडलवार रा. देगलूर, विजय रामदास तिवसकर रा. माहूर आणि कासीम खाकरा रा. माहूर.

# किनवट तालुक्यात उष्माघाताचा बळी

**किनवट (प्रतिनिधी)–** तालुक्यातील इस्लापूर येथे उन्हात पाणी भरण्यासाठी गेलेल्या एका ६५ वर्षीय महिलेचा उष्माघाताने मृत्यू झाल्याची घटना घडली.

इस्लापूर येथील लक्ष्मीबाई तुकाराम चिंतलवाड (वय ६५) ही महिला सोमवारी भरउन्हात पाणी भरत असताना या महिलेची काही वेळातच तब्येत बिघडली. यातच या महिलेचा मृत्यू झाला. सदर दुर्घटनेची माहिती इस्लापूर प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी एस. एम. खुपसे यांनी दिली आहे. महाराष्ट्रात अनेक ठिकाणी उष्णतेची तीव्रता वाढली आहे. त्यामुळे नागरिकांनी आरोग्याची काळजी घेणे आवश्यक आहे, विशेषतः लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिकांनी उन्हात फिरणे टाळावे, भरपूर पाणी प्यावे, असे आवाहन आरोग्य विभागाच्यावतीने करण्यात आले आहे.

# आजपासून 'आयजीं'चे अवैध व्यवसायाविरोधी अभियान -१

**नांदेड (प्रतिनिधी)–** दि. १ ते ३१ मे २०२५ दरम्यान, नांदेड पोलीस महानिरीक्षकांच्या परिक्षेत्रात अवैध व्यवसायाविरोधी अभियान-१चे आयोजन करण्यात आले आहे.

मागील विधानसभा निवडणुकीदरम्यान, परिक्षेत्रातील अवैध व्यवसायांना पायबंद घालण्यासाठी, परिक्षेत्रातील नांदेड, परभणी, हिंगोली व लातूर या चारही जिल्ह्यांत एकाच वेळी मासरेड करण्यात आली होती. विधानसभा निवडणुकी दरम्यान अशा एकूण सहा मासरेड आयोजित करण्यात आल्या होत्या व त्यानुसार अवैध व्यवसायांविरोधात मोठ्या स्वरूपाच्या कारवाया झाल्या होत्या. त्यामध्ये नांदेड जिल्ह्यात ४१२ गुन्हे दाखल करून ४१९ आरोपींकडून १८ लाख ४७ हजार ११० रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तसेच परभणी जिल्ह्यात २८० गुन्हे दाखल करून २८३ आरोपींकडून १३ लाख ७६ हजार ६३१ रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. यासह हिंगोली ५ लाख ४३ हजार ४१६ रूपये आणि लातूर जिल्ह्यातून ३४ लाख ५७ हजार ६५२ रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. असा एकूण चार जिल्ह्यांतून १२७० गुन्हे दाखल करून १२२६ आरोपींकडून ७२ लाख २४ हजार ८०९ रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.




चालू महिन्यात दि. १३ एप्रिल रोजी परिक्षेत्रात अवैध व्यावसायिकांविरुद्ध आणखी एक मासरेड आयोजित करण्यात आली होती. सदर मासरेडचे दरम्यान देखील चारही जिल्ह्यात एकूण (२६८) आरोपींविरुद्ध, (२६७) केसेस करण्यात आल्या होत्या व त्यायोगे (१३ लाख २७ हजार ४८७ रुपयांचा माल हस्तगत करण्यात आला होता.

तथापि, परिक्षेत्रात सुरू असलेल्या अवैध दारू, मटका, जुगार, ऑनलाइन लॉटरी, क्रिकेट बॅटिंग, गुटखा, अंमली पदार्थ, वेश्याव्यवसाय, वाळू उपसा व वाहतूक, अवैध प्रवासी वाहतूक इत्यादींना आळा घालण्याकामी व्यापक मोहिमेची आवश्यकता लक्षात घेऊन, दिनांक १ मे पासून म्हणजे महाराष्ट्र दिनापासून परिक्षेत्रातील चारही जिल्ह्यांत अवैध व्यवसाय विरोधी अभियान-१ चे आयोजन करण्यात आले आहे.

सदर मोहिमेत, पोलीस ठाण्यांचे प्रभारी अधिकारी, अंमलदार यांच्यासह सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी व अपर पोलीस अधीक्षक हे सहभागी होणार आहेत. त्याचप्रमाणे, स्थानिक गुन्हे शाखा व विशेष पोलीस पथके ही देखील कारवाईत सहभागी होणार असून, संबंधित जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक हे अवैध व्यवसाय विरोधी कारवायांवर देखरेख ठेवणार आहेत.

सदर मोहिमेदरम्यान, सातत्याने अवैध व्यवसाय सुरू ठेवणाऱ्या व्यावसायिकांविरुद्ध तडीपार, एम.पी.डी.ए. व प्रकरण परत्वे मोक्का कायद्याखाली देखील कारवाई करण्याबाबतच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

आपल्या भागातील अवैध व्यवसायांची माहिती, नागरिकांनी नजीकच्या पोलीस ठाण्यास अथवा पोलीस उप महानिरीक्षक कार्यालयाच्या nandedrange.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर कळवून आपल्या भागातील अवैध व्यवसायांचा बिमोड करण्यासाठी आपला हातभार लावावा, असे आवाहन पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी केले आहे.



जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

# आज महाराष्ट्रदिन!

महाराष्ट्र म्हटल्यानंतर मराठी भाषा असलीच पाहिजे असा समज महाराष्ट्राबाहेरच्या लोकांचा आहे, परंतु प्रत्यक्षात महाराष्ट्रामध्ये मात्र मराठीची अवस्था केविलवानी झालेली आहे. एकीकडे महाराष्ट्राची बोली आहे तर दुसरीकडे तथाकथित प्रमाणभाषा मराठी आहे. मराठी भाषा वाचविण्यासाठी वैयक्तिक, संस्थांत्मक आणि शासनस्तरावरही आटोकाट प्रयत्न सुरू आहेत तर दुसरीकडे मराठवाडा आणि विदर्भ या ठिकाणची मराठी जोपासणे बाबत मात्र फारसे काही केले जात नाही. मराठीसाठी महाराष्ट्र शासनाची राज्य मराठी विकास संस्था, साहित्य संस्कृती मंडळ, मराठी कोश मंडळापासून महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या गावागावांतील शाखेपर्यंत अनेक संस्था प्रयत्न करत आहेत. साहित्य संमेलने व चर्चासत्रांतही त्यावर चर्चा होत असतात. भाषेच्या प्रमाणीकरणासाठी ध्येय- धोरणांमध्ये अनेकदा बदलही घडवून आणले गेले आहेत. अनेकदा शुद्धलेखनापासून प्रमाणलेखनापर्यंतच्या नियमांत बदल करण्यात आले आहेत. तीच बाब मराठी कोश मंडळाने राज्य मराठी विकास संस्थेने आणि साहित्य संस्कृती मंडळानेही स्वीकारली आहे, हे स्वागतार्ह आहे. हे प्रयत्न अत्यंत तोकडे आहेत. काही वेळात ह्या सर्व योजना कागदावरच दिसून येतात, प्रत्यक्षात आनंदी आनंद आहे. आजही बोली भाषा आणि प्रमाण भाषा यांच्यातील द्वंद्व मात्र कायमच आहे जे मराठी भाषेच्या विकासामध्ये अडथळा आणत आहे. वास्तविक पाहता प्रमाण मराठी आणि बोली यांचा परस्पर संबंध नव्या पद्धतीने मांडता येणे शक्य आहे. दैनंदिन व्यवहारात जी बोलली जाते ती बोली. तीच खरी भाषा, ती शुद्ध किंवा अशुद्ध असण्याचा प्रश्नच नसतो. मात्र ग्रंथ, नियम, कायदे आणि जिथे बहुभाषिक एकत्र येतात, तिथे वापरावयाची भाषा ती प्रमाण भाषा असते. परंतु आपल्याकडे या भाषेलाच प्रमाण भाषा मानली जाण्याचा वाईट प्रघात पडला आहे, तो मोडीत काढणे गरजेचे आहे. कारण मराठी ही महाराष्ट्राची प्रमाण भाषा आहे. महाराष्ट्रातील जनतेचा व्यवहार मराठीतून चालतो, पण शासकीय कार्यालयांमध्ये मात्र वेगळीच भाषा वापरली जाते. महाराष्ट्राच्या विविध भागांत विविध बोली बोलल्या जातात त्याचा विकास देखील करणे तेवढेच गरजेचे आहे. मराठी भाषेमध्ये एवढे वैविध्य आहे तसे इतर भाषांमध्ये जाणवत नाही. उदाहरणादाखल खानदेशात अहिराणी, मराठवाड्यात मराठवाडी, मालवणमध्ये मालवणी, तर कोल्हापूरकडे कोल्हापुरी. या प्रादेशिक बोली आहेत, तर भिल्ली, लाडशाखी, गुजरी, अहिराणी, गोरमाटी, पावरी, परदेशी या प्रकारच्या जातीजमातींच्या बोली या सामाजिक बोली आहेत. विविध प्रादेशिक आणि समाजबोली बोलणाऱ्यांमधील भाषा व्यवहार सुकर व्हावेत यासाठी विविध बोलींतील प्रमाण शब्दाबाबत नियमावली करून प्रमाण मराठी भाषा तयार करणे आवश्यक आहे. प्रमाण भाषा ही एखाद्या विशिष्ट जातीची किंवा समाजाची किंवा एखाद्या विशिष्ट भूभागाची भाषा नसते, ती ग्रंथांची भाषा असते. त्यामुळे या सर्व बोलींतील शब्दांचा साठा हा प्रमाण मराठीचे वैभव वाढविणारा आहे. असे असूनदेखील मराठीच्या बृहत्कोशात मराठवाडी भाषेची स्वतंत्र बोली म्हणून अभ्यास व्हायला हवा, पण तसे होत असल्याचे दिसत नाही. असे केल्याने अर्थात या बोलींतील शब्द आणि वाक्यांच्या समावेशामुळे मराठीची शुद्धता हरपेल, ही काहीजणांना वाटणारी भीती निराधार आहे. विविध बोलींतील लेखक, कवी, कथाकार, नाटककार आपल्या जीवनानुभवांचे चित्रण करताना त्यांच्या बोलीतील शब्द सहजपणे वापरतात. मग अशा शब्दांना प्रमाण मराठीने आपल्या कोशात स्थान दिले नाही तर मराठी परिपूर्ण प्रमाण भाषा होऊ शकणार नाही. कोणतीही प्रमाण भाषा इतर बोलींतील आणि इतर प्रमाण भाषांतील प्रचलित शब्द आपल्यात सामावून घेत असतेच. इंग्रजीने तसे केले आहे, मराठीनेही तेच करायला हवे. मात्र तिची शुद्धता टिकविण्याच्या नादात ते टाळले जाते. म्हणूनच मराठी टिकवावयाची असेल तर हे धोरण स्वीकारावे लागेल. यासंदर्भात शासनाने तज्ज्ञांची समिती स्थापन करून पुढाकार घ्यावा आणि महाराष्ट्रातील विविध ठिकाणी बोलल्या जात असलेल्या मराठी भाषेचा किंवा त्या भाषांतील शब्दांचा समावेश प्रमाणभाषेत करून सर्वांचाच विकास कसा होईल यासाठी नियोजनबद्ध कार्यक्रम आखावा. मराठी भाषेच्या अधोगतीला मराठी माणूस देखील तेवढाच कारणीभूत आहे, कारण तो त्याच्या दुकानात, हॉटेलवर किंवा अस्थापनावर इंग्रजीत पाटी लावण्यात स्वतःचे भूषण समजतो. तसेच व्यवहारांमध्ये तो मराठी भाषा वापरण्यास संकोच करतो, कारण मराठी भाषा वापरल्यास त्याला लोक मागासलेला समजतील असा त्याचा गैरसमज आहे. यामुळे परप्रांती आणि देशद्रोही लोक मात्र त्यांचीच भाषा वापरतात आणि ती आपण सहन करतो हे एक आश्चर्य नव्हे का! आता तर महाराष्ट्रभर हिंदी लादण्याचा प्रयत्न केला जातो आहे. याला जोड म्हणून महाराष्ट्रातून मराठी शाळा हद्दपार करण्याचे नियोजित प्रयत्न शिक्षण माफिया आणि शासकीय भ्रष्ट अधिकारी यांच्या संयुक्त विद्यमाने होतो आहे, यावर इलाज काय?

# महाराष्ट्र आणि मायबोली देदीप्यमान होवो!




आज महाराष्ट्र दिन आणि मराठी राजभाषा दिन! आजच्या दिवशी महाराष्ट्र राज्य निर्मिती आणि माय मराठी महाराष्ट्राची राज भाषा म्हणून मान्यता पावली आहे! भारतवर्षाच्या इतिहासाबरोबरच महाराष्ट्राचा इतिहास तेवढाच गौरवशाली आणि वैभवशाली आहे! भारताच्या नकाशात अगदी मध्यभागी असणारे महाराष्ट्र राज्य आपली वेगळी ओळख सदैव टिकवून आहे. सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, भौगोलिक आणि सर्वच बाबतीत महाराष्ट्र आपले अस्तित्व सिद्ध करताना कुठेही पिछाडीवर नाही. आज महाराष्ट्राची राजधानी मुंबई ही संपूर्ण देशाची आर्थिक राजधानी म्हणून मान्यता पावली आहे. मुंबई आणि कोल्हापूर येथील चित्रनगरी आजही संपूर्ण जगाला भुरळ घालते आहे! हॉलीवूड सारख्या बॉलीवूड शब्दाची निर्मिती इथल्या जादुई नगरी मुंबईचीच! त्यामुळे संपूर्ण जग जीवाची मुंबई करण्यासाठी मुंबईला येतेच येते! इतिहासात देशाला या मातीने अनेक हिरे माणिकांची माला अर्पण केली आहे.

छत्रपती शिवराय, क्रांतिसूर्य महात्मा जोतीराव फुले आणि ज्यांच्या राज्यघटना लेखणीवर संपूर्ण भारताची मदार अबाधित आहे असे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर याच मातीने उपजविले आहेत. दिवसेंदिवस डॉ. बाबासाहेब जगात आणखीनच प्रकाशमान होत असून, त्यांच्यावर जगभर संशोधन सुरूच आहे. एवढेच काय(?), गान कोकिळा, गान सम्राज्ञी लता मंगेशकर, क्रिकेटचा बादशहा सचिन तेंडूलकर, सुपर संगणकाचे निर्माते डॉ. विजय भटकर इत्यादी आणि अन्य अनेक महान लोकांनी इथल्या मातीतून उगवून भारत देशाची कीर्ती जगात उज्वल केली आहे!

राकट, कणखर, लढाऊ आणि बुद्धिमान असणाऱ्या लोकांची खाण महाराष्ट्र राज्य देशात सदैव झळकत असतो. महाराष्ट्राचा मौर्य-अशोक-यादव हा मोठा देदीप्यमान कालखंड राहिला आहे. त्याला जोडून अठरापगड जातींची एकसंध वज्रमुठ बांधून छत्रपती शिवाजी महाराजांनी इथे मराठी अस्मितेचे, रयतेच्या हक्काचे मराठी साम्राज्य उभे करून सर्वकाळ महाराष्ट्राच्या शिरपेचात सन्मानाचा तुरा खोवला आहे! पेशवाईचा अस्त झाल्यानंतर मधला काळ इथल्या रयतेसाठी खडतर गेला. यवन आणि ब्रिटीशांची सत्ता महाराष्ट्राला झळा देऊन गेली. त्यानंतर देशात स्वातंत्र्याचे वारे वाहतांना इथल्या सुधारक आणि स्वातंत्र्यवीरांनी पुन्हा आपला कणखर बाणा दाखवतांना ब्रिटिशांना सळो की पळो करून सोडले. बाबू गेनू सैद या क्रांतीविराने बलिदान देऊन इंग्रजांच्या विरोधात जन प्रक्षोभ उभा केला. बाबू गेनुंच्या बलिदानाने शेजारच्या गावातील राजगुरू क्रांतिकारक हे घरातून सरळ स्वातंत्र्य चळवळीत सहभागी होताना क्रांतिवीर भगतसिंग आणि सुखदेव यांच्याबरोबर देशासाठी समर्पित झाले. अशी ही बलिदानाने आणि बहुआयामाने समृद्ध असणारी महाराष्ट्र भूमी आणि तिचा गौरवशाली इतिहास सर्वकाळ देशाला आणि आपल्या सर्वांनाच नित्य नित्य उर्जा देत असतो. त्याच्या जोडीला इथला भूगोलही तेवढाच विस्मयकारी आणि विशेष आहे. इथे वेरूळ, अजंता, औंढा नागनाथ सारखी जगप्रसिद्ध शिल्पे मोठ्या दिमाखाने उभी असून ही स्थळे महाराष्ट्राचे श्रेष्ठत्व सदैव अधोरेखित करत असतात. यासह छत्रपती शिवरायांनी उभारलेले अनेक गड-किल्ले आपला राकट, लढाऊ इतिहास जिवंत ठेवून आहेत. त्याच्या जोडीला इथली मायबोली मराठीही तेवढीच समृद्ध आणि श्रीमंत आहे!

मायबोली मराठी आपल्या उदरात प्राचीनतत्व घेऊन नित्यनेमाने अर्वाचीन आणि आधुनिकतेला उपजवितांना आपले नवनवोन्मेष स्वरूप उजळते आहे. ज्ञान मंदिरात नंदादीप पाजळत आहे. चक्रधर, महाधंबा, मुकुंदराज, म्हाइंभट, नामा, जना, ज्ञाना, चोखा, सावता, गोरा, मुक्ता, निवृत्ती, बंका, कान्होपात्रा, एका, तुका, रामदास, दासोपंत आदी महानुभावांनी अखंड शब्दसाधना करताना मायबोली मराठीच्या दीपात सुंदर शब्दांच्या अनंत वाती चेतवून इथला आसमंत नवचेतनेने प्रज्वलित केला आहे. अशा समृद्ध भाषेला अलीकडे कोसंबी, फुले दांपत्य, सावरकर, रानडे, बापट, बहिणाबाई, बाबासाहेब, टिळक, साठे, अत्रे, फडके, शिरवाडकर, केशवसुत, देसाई, करंदीकर, माडगुळकर, खांडेकर, थत्ते, मर्ढेकर, तांबे, बहिणाबाई, गडकरी, कुलकर्णी, तेंडूलकर, देशपांडे, साने गुरुजी, भावे, कांबळे, नारळीकर, काळे, भागवत, बोराडे, यादव, संत, अवचट, मनोहर, भट, पानतावणे, कोतापल्ले ते अगदी वर्तमानातील देशमुख, भालेराव, मुलाटे, लोमटे इत्यादी आणि अन्य अनेक महाराष्ट्राच्या भूमिपुत्रांनी इथली अक्षरगाथा आपल्या पूर्वजांना शोभेल अशीच उत्तमोत्तम निर्माण केलेली आहे.

एवढे सगळे करताना आपल्याला फार मोठे काम करायचे नाही. नंदादीप जळतो आहे. आपल्याला सर्वकाळ सोज्वळ प्रकाशित मायबोलीच्या दिव्यातील वात पुढे सरकवून त्यातील तेल कमी होऊ द्यायचे नाही. लाही लाही तापल्यानंतर पहिल्या श्रावण सरींनी येणारा मृदगंध काळजात जपून ठेवताना त्याला लोभस शब्दरूप द्यायचे आहे. त्याच्या जोडीला तो मधुर गंध जीवनाला नव्या दिशा देणारा राहायला हवा यासाठी लेखणी बंद होता कामा नये. ज्याप्रमाणे घाम आणि मातीतूनच अनेक सुखांची निर्मिती होत असते त्याच न्यायाने माय मराठीच्या साधनेने इथे कल्पित स्वर्गातील अमृत्पेक्षाही आनंददायी शब्दांची निर्मिती होत राहणे काळाची नितांत गरज आहे. असे होणे म्हणजे खऱ्या अर्थाने मानवी जीवनाला नव सुगंध देणे होय. मानवी जीवन मोठे विलोभनीय आणि विस्मयकारी आहे. त्या सचेत, सच्चिदानंद चेतनेचे आंबट, गोड, खारट, तुरट अनुभूतीत प्रकटीकरण शब्द लालीत्याने करताना मानवी जगण्याला नवांकुर फोडण्याचे काम आपण सर्व सृजानांनी करणे क्रमप्राप्त आहे. आत्तापर्यंत महाराष्ट्राने आणि मायबोली मराठीने अनेक कवी, कादंबरीकार, नाटककार, निबंधकार, समीक्षकांना जन्म देताना मातृ गौरव वृद्धिंगत केला आहे. मृदगंध ते फुलाच्या रंग-रूप-गांधातील काव्यरूपाचे चित्र सचित्र करण्याचे काम इथे सातत्याने होत आहे.

महाराष्ट्र आणि मायबोलीचा गौरव वाढवताना आपले हृदय आणखी विशाल करावे लागणार आहे. परिस्थिती आणि समाजाने जंगजंग छळले असतांना सृजन सुपुत्र ज्ञानोबा-तुकोबा आपल्या असीम सामाजोत्थानाच्या ध्येयापासून तसूभरही ढळले नाहीत. स्वतःच्या जगण्याची इभित झाली तरीही जगाच्या कल्याणा त्यांच्या विभूती शब्दांनी अभूतपूर्व क्रांती घडवून महाराष्ट्र मन भानावर ठेवण्याचे महत्कार्य केले! हा वाग्यज्ञ अखंड प्रवाही ठेवताना ज्ञानोबा आनंदाचे आवारात विश्वासाठी पसाभर दान मागतांना एरवी तरी मी मुर्खू असे अक्षरे लिहितात तर कळस तुकोबा लहानाहुनी लहान होऊन बुडणाऱ्या, सैरभैर, पथभ्रष्ट झालेल्या सामान्य जणांना योग्य मार्गावर आणण्यासाठी अंगावर दगड गोटे झेलून त्याच दगडावर आनंदाचे गाव जवळच आहे याची शब्दोशब्दी अनुभूती देतात.

माय बाप वाचकहो, मनुष्य हा केवळ मरणाचा सन्मित्र नसून तो आनंदी जीवनाचा निष्ठावंत साथी आहे. त्यासाठी एका एका शब्दाची बांधणी करतांना आपल्याला माय मराठी आणखी समृद्ध करावी लागेल. पूर्वजांनी लावलेल्या सुंदर वृक्षाला सिंचित करून अगोदरच्यापेक्षाही सुंदर फुले-फळे कशी लागतील(?), त्याच्या सोबतीने महाराष्ट्र देशातच काय जगात आणखीन कसा शोभायमान दिसेल(?) यासाठी आपण मोठ्या जबाबदारीने काम करावे लागेल. असे करताना उच्च शिक्षित आणि लेखकांची जबाबदारी वाढली आहे. जीवनातील सुख-दुःख दोन्ही सुंदर, प्रभावीपणे प्रकट करण्यासाठी आपल्याला जबाबदारी घ्यावी लागेल. आज महाराष्ट्र मन जात-धर्म-पंथ-भाषा इत्यादींच्या क्षणिक, अशाश्वत बाबींनी दुभंगू न देता ते कायम अभंग ठेवावे लागेल! तसे लेखन, भाषण आणि वर्तन करावे लागेल. असे होणे म्हणजे महाराष्ट्र आणि मायबोली कायम देदीप्यमान राहणे होय! जय महाराष्ट्र! माय मराठी चिरायू होवो!

**-प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये**
कै. रमेश वरपुडकर महाविद्यालय, सोनपेठ
जि. परभणी (महाराष्ट्र)
मो. ९१५८०६४०६८

# कामगार जगाचा आधारस्तंभ



कामगारवर्ग हा भारताचाच नाही तर संपूर्ण जगाचा आधारस्तंभ आहे, परंतु तो दिवसेंदिवस ढासळताना दिसत आहे. दरवर्षी १ मे हा दिवस जगभरात आंतरराष्ट्रीय कामगार दिवस म्हणून साजरा केला जातो. आज जगाचा विचार केला तर ८० टक्के लोक कामगारांमध्ये मोडतात यात अनेक क्षेत्रातील कामगार वर्ग दिसून येतात. शेतीतील कामगार असो, कारखान्यातील कामगार असो किंवा इतर कोणत्याही क्षेत्रातील कामगार असो त्याची अत्यंत दयनीय अवस्था दिसून येते. आज विकसित, विकसनशील, गरीब या संपूर्ण देशातील कामगारांवर जीवन-मरणाचा प्रश्न उद्भवत आहे.

आज भारताचा विचार केला तर सध्याच्या परिस्थितीत लोकसंख्येच्या बाबतीत स्फोटक आकडा दिसून येतो. भारताची लोकसंख्या १४० कोटींच्या पुढे गेल्याचे युनायटेड नेशन्स पॉप्युलेशन फंडच्या आकडेवारी नुसार दिसून येते.म्हणजेच चीनच्या लोकसंख्येपेक्षा २९ लाखाने जास्त असुन जगात प्रथम क्रमांकावर आहे. त्यामुळे सध्याच्या परिस्थितीत सरकार व राजकीय पुढाऱ्यांनी कामगारांची सर्वोतोपरी मदत करण्याची नितांत गरज आहे. आपल्या देशाचा विचार केला तर मूठभर राजकीय पुढाऱ्यांजवळ अरबो-खरबो रूपयांची चल-अचल संपत्ती आहे ही संपत्ती राजकीय पुढाऱ्यांनी कामगारांच्या प्रती उपयोगात आणली तर एक मदतीचा हात समजल्या जाईल. कामगार जगाचा शिल्पकार मानल्या जातो. तर शेतकरी हा अन्नदाता मानल्या जातो. यांची भूमिका देशासाठी व जगासाठी महत्त्वाची असते. आज मंदिर-मज्जीद, कारखाने, सरकारी इमारती, ताजमहाल, गुरूद्वारा, बौद्ध विहार, कुतुबमिनार, संसद भवन, अयोध्येतील राममंदिर मोठ-मोठी गडकील्ले जे आपण पहात आहोत ते संपूर्ण कामगारांच्या मदतीने बनवीण्यात आले. परंतु आज शिल्पकारचे हाल-बेहाल होत असल्याचे दिसून येते. कामगार हा जगाचा मोठा आधारस्तंभ आहे. कामगार नाही तर काहीच नाही. हीबाब भारतासह जगाने लक्षात ठेवली पाहिजे. कामगारवर्गामध्ये अशा अनेक अडचणी दिसून येतात की त्यांचा उदरनिर्वाह होणे अत्यंत कठीण झाले आहे.

आपण जर भारतातील ईपीएस-९५ च्या दीड करोड निवृत्त पेंशनधारकांचा विचार केला तर त्यांना १००० ते ३००० रुपयांपर्यंत पेन्शन मिळत आहे. पेंशन वाढण्याच्या आशेने निवृत्त पेंशनधारक मोठ्या आशेने सरकारकडे पहात होते. परंतु केंद्र सरकारने त्यांच्या मागणीकडे पाठ फिरविल्याचे दिसून येते. अल्पशा पेंशनमध्ये त्यांचा उदरनिर्वाह व औषधोपचार होऊ शकत नाही. त्यामुळे त्यांच्यापुढे आजही जीवन-मरणाचा प्रश्न उपस्थित आहे. असंघटीत कामगारांचा विचार केला तर त्यांची परिस्थिती आणखीनच कठीण व भयावह आहे. त्यामुळे भारतासह जगात आजच्या परिस्थितीत कामगारवर्ग अत्यंत दुःखी आणि चिंतेत दिसून येतो.

२०१९ ते २०२१ हे वर्ष संपूर्ण जगासाठी महामारीने जखडलेले वर्ष ठरले. आजही शेतकऱ्यांची गंभीर परिस्थिती आहेच त्याच्या दुप्पटीने कामगारांची गंभीर परिस्थिती दिसून येते. भारत हा शेतीप्रधान देश आहे. त्याचप्रमाणे बहुलोकसंख्येचा देश आहे. कामगार वर्ग मेहनतीने देशाच्या विकासासाठी व इतर कामांसाठी हातभार लावतो, परंतु त्या कामाचा मोबदला तुटपुंजा मिळतो. त्यामुळे आता समान कायदा, समान अधिकार, समान संपत्ती, समान वेतन, समान पेंशन यावर विचार करण्याची वेळ आलेली आहे.

एका कुटुंबाला रहाण्याकरिता किती जागा असावी, एका कुटुंबाजवळ उदरनिर्वाह करण्याकरिता किती संपत्ती असावी. यावर माननीय प्रधानमंत्री, राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, लोकसभा अध्यक्ष, सुप्रिमकोर्ट, हायकोर्ट यांना विचार करण्याची वेळ आली आहे. कारण ही दुःखदायी बाब आहे की, ज्यांना आपण लोकप्रतिनिधी, जनप्रतिनिधी, समाजसेवक म्हणतो अशा आजी-माजी राजकीय पुढाऱ्यांच्या संपत्तीचा विचार केला तर यांच्याजवळ आज अरबो-खरबो रूपयांची चल-अचल संपत्ती दिसून येईल. म्हणजेच राजकीय पुढारी तुपाशी आणि कामगार उपाशी अशी परिस्थिती आज भारतात सर्वत्र दिसून येते. यामुळेच देशात महागाई, बेरोजगारी, शिक्षणाचा अवाढव्य खर्च, आरोग्य सुविधा इत्यादीसह अनेक ज्वलंत समस्यांनी जन्म घेतला आहे राजकीय पुढारी नेहमी समान अधिकाराची भाषा करतात, परंतु ही सर्व राजकीय खेळी असते ही बाब सर्वांनाच लक्षात आहे. त्यामुळे करोना काळात झालेले नुकसान व जगातील सध्याची युद्धजन्य परिस्थिती पहाता आणि पुढे येणारी समस्या पहाता समान अधिकार, समान वेतन, समान संपत्ती यावर चर्चा करून नवीन कायदा सरकारने अमलात आणायला हवा. तेव्हाच कामगारवर्ग व गरीब वर्गाला दिलासा मिळेल अन्यथा श्रीमंत हा श्रीमंत होत जाईल व गरीब हा गरिबीच्या खाईत गुदमरून मरेल. करिता गरीब वर्ग व कामगार वर्ग यांच्या प्रती गांभीर्य बाळगून सरकारने कडक नियमावली आखली पाहिजे. तेव्हाच कामगार वर्ग सुखाने जगेल व योग्य न्याय प्राप्त होईल.

भारत सरकारने कामगार दिनाचे औचित्य साधून कामगारांच्या प्रती मोठे पाऊल उचलण्याची गरज आहे. देशातील दीड करोड ईपीएस-१९९५ पेंशनधारकांचा प्रश्न अजूनही रखडलेला आहे. त्यावरसुध्दा भारत सरकारने गांभीर्याने विचार करून अंतिम निर्णय घ्यायला हवा. पेंशनधारकांची एकच मागणी आहे की कमीत कमी ७५०० रुपये पेन्शन, महागाई भत्ता व आरोग्य सुविधा मिळावी. एवढे कार्य सरकारने केले तर ईपीएस-९५ चा पेन्शन धारक धन्य होईल. परंतु सरकार व ईपीएफओ पळवाटा काढताना दिसतात. सरकारने कामगारांच्या जखमेवर फुंकर घालावी. यालाच खरा कामगार दिवस समजल्या जाईल. कारण ज्या देशाचा कामगार सुखी तो देश सुखी हे ही तितकेच सत्य आहे. सध्याच्या परिस्थितीत कामगार चळवळी संपुष्टात आल्या आहेत. त्यामुळे सरकारच कामगारांचे सर्वेसर्वा आहेत. अशा परिस्थितीत सरकारनेच कामगारांच्या प्रती योग्य पावले उचलून दिलासा दिला पाहिजे. कारण भारतातीलच नाही तर संपूर्ण जगातील कामगार वर्ग अत्यंत संवेदनशील आहेत. त्यामुळे त्यांच्या कार्यकुशलतेचा मोबदला त्यांना मिळायलाच पाहिजे.कारण कामगार हा जगाचा आधारस्तंभ आहे.या आधारस्तंभाला टिकवून ठेवण्याची जबाबदारी भारतासह संपूर्ण जगाची आहे

कामगारांच्या प्रती सहानुभूती, सहकार्याची भावना सरकारने व भांडवलशाही वर्गाने अंगीकारली पाहिजे. यातच खऱ्या अर्थाने कामगार दिवसाची प्रतीमा दिसून येईल. देशाचा राजकीय पुढारी कामगार दिनाच्या निमित्ताने कामगारांना योग्य न्याय देण्याचे वचन देत असेल व त्यांच्या प्रती आदर ठेवत असेल तरच याला खऱ्या अर्थाने कामगार दिवस समजल्या जाईल. जगातील बदलते हवामान पहाता कामगार दिनाचे औचित्य साधून भारतासह जगातील देशांनी या दिवसाला मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड करून कामगार दिवस साजरा करावा. यामुळे निसर्ग प्रफुल्लित राहील. जय हिंद!

**-रमेश लांजेवार**
नागपूर
मो.९९२१६९०७७९

# महाराष्ट्र राज्य निर्मितीचा संघर्षमय इतिहास



भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर तेरा वर्षांनी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. मुंबई महाराष्ट्राला मिळणार नाही ही ज्या वेळेस स्पष्ट झाले. त्यावेळी प्रचंड जन आंदोलन उभे राहिले. त्यातून राज्य शासनाने केलेल्या गोळीबारात १०६ जण महाराष्ट्र राज्याचे सुपुत्र हुतात्मा झाले. या हौतात्म्य पत्कारलेल्या १०६ जणांचे स्मारक मुंबईत क्लोरा फाऊंटनजवळ उभारले आहे. त्या वीर जवानांना विनम्र अभिवादन.

लॉर्ड कर्झनने १९०५ मध्ये बंगालची फाळणी केली, परंतु लोकांनी जोर-दार निदर्शने करून ती रद्द करायला भाग पाडले, त्यामुळे न. चि. केळकर यांनी म्हटले आहे की, मराठी भाषा बोलणाऱ्यांची सर्व लोकसंख्या एकाच छत्राखाली असावी, त्यामुळे भाषावार प्रांतरचनेची मागणी केली गेली, तेव्हापासूनच महाराष्ट्र राज्यांची निर्मिती करण्याचे प्रयत्न सुरू झाले. १२ मे १९४६ मध्ये सध्या कर्नाटका - मध्ये असलेला बेळगाव येथे साहित्य संमेलन झाले, आणि तेथे महत्त्वपूर्ण ठराव मंजूर करण्यात आले. २८ जुलै रोजी शंकरराव देव यांच्या अध्यक्षतेखाली मुंबई या ठिकाणी महाराष्ट्र एकीकरण परिषद भरली, तिथे सुद्धा मराठी भाषिकांना प्रांत वेगळा असावा असा ठराव संमत करण्यात आला. १७ जून १९४८ रोजीज्ञ न्यायाधीश मा. एस. के. दार अध्यक्षतेखाली दार कमिशनची स्थापना झाली. हळूहळू महाराष्ट्र राज्य निर्मिती होण्यासाठी या सर्व गोष्टी अतिशय महत्त्वाच्या ठरल्या २९ डिसेंबर १९४८ रोजी जी. व्ही. पी. समिती स्थापन करण्यात आली या समितीने भाषावार प्रांतरचना करण्यासाठी तत्त्व: मान्य आहे. पण ही वेळ योग्य नाही अशी शिफारस केली. त्यामुळे जनजागृतीसाठी सेनापती बापट यांनी अनेक प्रभात फेऱ्या काढल्या. असे सांगितले की संयुक्त महाराष्ट्राचा ठराव ५० विरोध ३५ मताने मंजूर झाला, त्यामुळे मुंबई महाराष्ट्रातच असणार असे जनतेने सिद्ध करून दाखविले,

सर्व मराठी भाषिक लोकांचे राज्य स्थापन करण्यासाठी १९५३ मध्ये नागपूर या ठिकाणी करार झाला. या करारानुसार तांत्रिक व व्यावसायिक शिक्षणासाठी पुरेसा निधी द्यावा. त्याच्या भागातील लोकसंख्येच्या प्रमाणात राज्य शासनाच्या सेवेत नोकरीच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात. एक अधिवेशन नागपूर या ठिकाणी घेतले जावे.अशी या नागपूर कराराद्वारे हमी देण्यात आली,

मुंबई या ठिकाणी कामगार मैदानावर शंकरराव देव म्हणाले महाराष्ट्रापासून मुंबई वेगळी करायला आपण प्राणपणाने विरोध करू, त्यामुळे जनतेच्या भावनांना आणि मागण्यांना जनआंदोलनाचे स्वरूप येऊ लागले. यामध्ये शूर महिलाही पुढे होत्या. पुरुषाच्या खांद्याला खांदा लावून त्या आंदोलनात सहभागी झाल्या सुमतीबाई गोरे,कमलाताई मोरे, सुलताना जोहारी, तारा रेड्डी, चारुशीला गुप्ते, इस्मत चुगताई, दुर्गा भागवत या महिलांनी महाराष्ट्राच्या निर्मितीच्या आंदोलनात उडी घेतली, त्यामुळे हे आंदोलन व्यापक झाले, अनेक राजकीय पक्ष, कामगार पक्ष, समाजवादी पक्ष, प्रजा समाजवादी, विविध कामगार संस्था हे सर्व एकत्रित आले आणि ७ नोव्हेंबर १९५५ रोजी कामगारांची सभा झाली, या सभेचे अध्यक्ष कॉम्रेड श्रीपाद अमृत डांगे होते. या आंदोलनात एस. एम. जोशी यांनी महत्त्वाचे ठराव मांडले. मोरारजी देसाई हे तत्कालीन मुख्यमंत्री होते. सेनापती बापट यांच्या नेतृत्वाखाली मुंबई येथे विधानसभेवर जनसमुदाय मोर्चा घेऊन निघाले. शासनाने बंदी आदेश पुकारले. प्रचंड जमलेल्या जनसमुदायावर लाटी हल्ला करून धुरांचा वापर केला गेला. सायंकाळी ५० हजार लोकांच्या उपस्थितीत जाहीर सभा झाली. कॉम्रेड डांगे यांनी जनसमुदायाला मार्गदर्शन केले, त्यानंतर २१ नोव्हेंबर १९५५ रोजी एक दिवसाचा संप करण्याचा निर्णय घेण्यात आला. संपूर्ण राज्यभर असंतोष खदखदत होता.

६ फेब्रुवारी १९५६ रोजी केशवराव जेधे यांच्या अध्यक्षतेखाली पुणे या ठिकाणी टिळक मंदिरात सभा झाली. या सभेमध्ये सुद्धा महत्वपूर्ण भूमिका अनेक लोकांनी बजावली. त्यात क्रांतिसिंह नाना पाटील, अहिल्याबाई रांगणेकर, मधू दंडवते, आचार्य प्रल्हाद केशव अत्रे, प्रबोधनकार केशव ठाकरे यांनी एकत्रित येऊन श्रीपाद अमृत डांगे यांना अध्यक्ष व उपाध्यक्ष म्हणून डॉ. त्रां. रा, नरवणे यांना केले. सचिव पदाची धुरा एस. एम. जोशी यांच्याकडे दिली. हे आंदोलन महाराष्ट्रातील वाड्या वस्त्यांवर, खेड्यापाड्यांत पोहोचले.

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतापगडावरील पुतळ्याचे अनावरण तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या हस्ते ३० नोव्हेंबर १९५७ रोजी पार पडले. त्यावेळी मराठी भाषिकांच्या भावनांची आणि परिस्थितीची जाणीव त्यांना करून देण्यात आली, त्यामुळे महाराष्ट्र निर्मितीस अनुकूल वातावरण तयार झाले,

काँग्रेसच्या अध्यक्षा इंदिरा गांधी यांनी आपले वजन संयुक्त महाराष्ट्राच्या पारड्यात टाकले. एप्रिल १९६० मध्ये संसदेने मुंबई पुनर्रचना कायदा मंजूर केला, आणि त्यानुसार एक मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. याच काळात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, शाहीर अमर शेख, शाहीर द. ना. गवाणकर यांनी आपल्या लेखणीतून मोठ्या प्रमाणात जनजागृती केली.

तसेच मराठी वृत्तपत्रांनी म्हणजेच प्रबोधन, केसरी, सकाळ, नवाकाळ, नवयुग, प्रभात अशा वृत्तपत्रांनी लोकांपर्यंत स्फुर्तीदायक बातम्या पोहोचल्या. मराठा वृत्तपत्राने महत्त्वाचे कार्य केले. बाळासाहेब ठाकरे यांनी मावळा या टोपण नावाने व्यंगचित्र काढून जन आंदोलनाला व्यापक रूप दिले. अशा या सर्वांच्या कामगिरीतून महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. त्यामुळे जय जय महाराष्ट्र माझा, असे म्हणण्यास काही हरकत नाही. यावेळी झालेल्या आमदार झुंज गोळीबारात १०६ वीर हुतात्मा झाले. त्यांची आठवण आपल्याला कायमस्वरूपी राहावी त्यांनी सांडलेल्या रक्ताचा थेंब ना थेंब देशाच्या प्रगतीसाठी उपयोगाला यावा, महाराष्ट्र राज्य निर्मिती झाली त्यावेळी या महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री म्हणून यशवंतराव चव्हाण यांची निवड करण्यात आली. आज महाराष्ट्र हे प्रगत राष्ट्र म्हणून ओळखले जाते. येथे विधानसभेवर २८८ व विधान परिषदेत ७८ आमदार घेऊन राज्याचा गाडा हाकला जातो. महाराष्ट्रामध्ये असणारा सांस्कृतिक ठेवा फार मोठा आहे म्हणून निढळाच्या घामाने भिजलेला कणखर राकट देश महाराष्ट्र आहे. असे येथे म्हटले जाते. महाराष्ट्र दिनाची निर्मिती फार कष्टाने व परिश्रमाने झालेली आहे. तसेच आज जागतिक कामगार दिन आहे. महाराष्ट्र दिन व कामगार दिनानिमित्त सर्वांना खूप खूप सदिच्छा.

**-प्रा. विठ्ठल बरसमवाड**
अध्यक्ष : विठू माऊली प्रतिष्ठान
खैरकावाडी ता.मुखेड जि.नांदेड

## थोडक्यात...

### महापालिकेचे अख्तर बेग सेवानिवृत्त

**नांदेड (प्रतिनिधी)**– महानगरपालिकेतील कार्यालयीन अधिक्षक अख्तर बेग इनामदार ३० एप्रिल रोजी नियत वयोमानानुसार सेवा निवृत्त झाले.



इनामदार हे महापालिकेच्या निवडणूक विभागाचे तज्ज्ञ म्हणून ओळखल्या जात असत. इनामदार यांनी निवडणूकीची कामे यशस्वीरित्या पार पाडुन महापालिका निवडणूक कामी आपला स्वतंत्र असा ठसा उमटविला आहे. १९८७ मध्ये तत्कालीन नांदेड नगरपरिषद मध्ये लिपीक म्हणून रुजू झाले होते. नांदेड महापालिकेत निवडणुकीची कामे सुरळीतपणे पार पाडण्याची जबाबदारी तत्कालीन माजी उपआयुक्त रत्नाकर वाघमारे यांच्या अधिनस्त व मार्गदर्शनाखाली इनामदार यांनी चोखपणे पार पाडलेली आहे.

### शिक्षक एस. आर. बिरगे सेवानिवृत्त

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)**– सिडको येथील शिवाजी हायस्कूलमधील हिंदी विषयाचे शिक्षक एस. आर. बिरगे हे दि. ३० एप्रिल रोजी सेवानिवृत्त झाले.



सिडको येथील शिवाजी हायस्कूल मध्ये ते दि. ३० जून १९९० रोजी रूजू झाले. सेवा काळात एक उपक्रमशिल व विद्यार्थीप्रिय शिक्षक म्हणून तर शालेय अध्यापन बरोबर शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात नावलौकिक मिळविला आहे. एस. आर. बिरगे ३० एप्रिल २५ रोजी वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले असून सेवानिवृत्ती निमित्ताने मुख्याध्यापक प्रा. एस. एम. देवरे व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.

# परभणी येथील सद्भावना रॅलीत हजारोंच्या संख्येने सहभागी होण्याचे काँग्रेसचे आवाहन

## नांदेड काँग्रेस सोबत तीस वर्षाचा संबंध -मोहन जोशी

**नांदेड (प्रतिनिधी)**– जिल्ह्यातील काँग्रेस सोबतचा माझा गत तीस वर्षापासूनचा संबंध आहे. निष्ठावंत कार्यकर्ते आजही काँग्रेस सोबतच आहेत. स्थानिक पातळीवरील राजकीय परिस्थिती बदललेली असताना देखील काँग्रेससोबत खंबीरपणे उभा राहणाऱ्या प्रत्येक कार्यकर्त्याचे मी अभिनंदन करतो. परभणी येथे ४ व ५ मे रोजी होणाऱ्या सद्भावना पदयात्रा व राज्यस्तरीय संविधान बचाव रॅलीला हजारोंच्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस उपाध्यक्ष मोहन जोशी यांनी केले.

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसच्या वतीने परभणी येथे ४ व ५ मे रोजी सद्भावना पदयात्रा व राज्यस्तरीय संविधान बचाव रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. यासंदर्भात नियोजन बैठक महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष मोहन जोशी, खा. रविंद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत बुधवारी (दि.३०) रोजी काँग्रेस पक्ष कार्यालयात



पार पडली. यावेळी ते बोलत होते.

प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, विधीमंडळ पक्षनेते विजय वडेट्टीवार आदीसह इतर ज्येष्ठ नेते मंडळी यांच्या उपस्थितीत दि. ४ मे रोजी सकाळी ९ वाजता परभणी जिल्ह्यातील नृसिंह पोखर्णी मंदिराजवळून रॅलीला प्रारंभ होणार आहे. ही यात्रा दुपारी बारा वाजता शिंगणापूर फाटा येथे विश्रांतीसाठी थांबणार आहे. पुन्हा सायं. ४ वाजता यात्रा सुरु होईल व सायं. ७ वाजता गंगाखेड रोडवरील माहेर मंगल कार्यालयात मुक्कामी असणार आहे. दुसऱ्या दिवशी दि. ५ मे रोजी सकाळी ९ वाजता महामानवांच्या पुतळ्यांना अभिवादन करुन पदयात्रा सुरु होईल व परभणी शहरातील विविध भागांमधून मार्गक्रमण करीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळ आंदोलन भूमी येथे पदयात्रेचा समारोप होणार आहे. सद्भावना पदयात्रेचे रुपांतर संविधान बचाव रॅलीमध्ये होईल. या रॅलीत काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तसेच राज्याचे प्रभारी रमेश चेन्निथला यांच्यासह प्रांताध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, राज्यातील इतर ज्येष्ठ नेते मंडळी मार्गदर्शन करणार आहेत. यावेळी खा. रवींद्र चव्हाण, जिल्हाध्यक्ष बी.आर. कदम, महानगराध्यक्ष अब्दुल सत्तार, श्याम दरक, सुरेंद्र घोडसकर, सुरेशदादा गायकवाड, यशपाल भिंगे, संजय बेळगे, केदार पाटील साळुंखे, आनंद चव्हाण, प्रफुल्ल सावंत, बालाजी चव्हाण, अब्दुल गफार, सुरेश हटकर, गंगाधर सोनकांबळे, महेश देशमुख, सत्यपाल सावंत, डॉ. करुणा जमदाडे, विठ्ठल पावडे, रहिम खान, अजित कुरेशी, बालाजी गाडे, सतीश देशमुख, सुनील वानखेडे, प्रतापराव देशमुख, गोविंद बाबा गौड, नरेंद्र रेड्डी, गणेश ढगे, संदीप देशमुख बारडकर, शिवाजी पाटील पाचपिंपळीकर, बापूसाहेब पाटील, मुन्ना अब्बास, कैलास गोडसे, दीपक सिंग हजूरिया, गगनसिंग यादव, संजय वाघमारे, माधव पवळे, अनिल चेमेगाकार, श्याम पाटील, धनंजय उमरीकर, गोविंद पाटील आदीसह अन्य पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

# महात्मा बसवेश्वर महाराज यांच्या जयंतीनिमित्त सिडकोत काढण्यात आली शोभायात्रा

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)**– महात्मा बसवेश्वर महाराज यांच्या जयंतीनिमित्त दि.३० रोजी सिडको शिवलिंगेश्वर मंदिर ते नवीन कौठा बसवेश्वर महाराज पुतळा अशी शोभायात्रा काढण्यात आली. या शोभायात्रेत माजी आमदार अमर राजुरकर व भाजपाचे माजी महानगर अध्यक्ष दिलीप कंदकुर्ते यांच्यासह महिला व समाज बांधवांनी उत्स्फूर्ते सहभाग घेतला.



सामाजिक कार्यकर्ते तथा आयोजक विनोद कांचनगिरे व संतोष कांचनगिरे यांच्या वतीने शिवलिंगेश्वर मंदिर सिडको ते मुख्य मार्गावर शंकरनगर, जिजाऊ सृष्टी, अण्णा भाऊ साठे पुतळा छत्रपती शिवाजी महाराज चौक, महाराणा पुतळा सिडको संभाजी चौक, लातूर फाटा ते बसवेश्वर महाराज पुतळा नवीन कौठा अशी शोभायात्रा काढण्यात आली. यावेळी माजी आमदार अमर राजूरकर, दिलीप कंदकुर्ते, संजय पाटील घोगरे, ॲड. अविनाश भोसीकर, विनायक आकुरगे, प्रा. एस. व्हि. शेटे, नवनाथ कांबळे, सतीश बसवदे, भि. ना. गायकवाड, विलास गजभारे, राजु लांडगे, गजानन कते, सरदार काचवाले, सेवानिवृत्त उपनिरीक्षक सुभाष चोपडे, ॲड. समिर पाटील, सुनिल शिंदे, श्रीराम देशमुख, पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर आदी मान्यवर उपस्थित होते.

प्रारंभी राजपुरोहित पिंटू महाराज यांनी विधीवत पूजन केले. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते महात्मा बसवेश्वर महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. आयोजक कांचनगिरे यांनी प्रमुख पाहुण्यांचा शाल श्रीफळ देऊन सत्कार केला. महिला भजनी मंडळांच्या वतीने माजी आमदार अमर राजूरकर यांचाही सत्कार करण्यात आला.

भगवा ध्वज दाखवून फटाक्यांची आतषबाजी करीत आणि ढोल ताशांच्या गजरात हरहर महादेव घोषणा देत शोभायात्रेचा प्रारंभ करण्यात आला. मुख्य मार्गावर अनेक ठिकाणी या शोभायात्रेचे सामाजिक, राजकीय नेते, पुढाऱ्यांसह पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी स्वागत केले. प्रा. डॉ रमेश नांदेडकर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. यावेळी रात्री उशिरा शोभायात्रा नवीन कौठा येथील बसवेश्वर पुतळा येथे आल्यानंतर पुतळ्यास कांचनगिरे परिवार यांच्या वतीने पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

# आ. प्रताप पाटील चिखलीकर यांच्या निवासस्थानी जगत्ज्योती महात्मा बसवेश्वर यांना अभिवादन



**नांदेड (प्रतिनिधी)** – जगाला शांती आणि समतेचा संदेश देणारे जगत्ज्योती महात्मा बसेश्वर महाराज यांच्या जयंती सोहळ्यानिमित्त बुधवारी आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या वसंत नगर येथील 'साई सुभाष' निवासस्थानी महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी आ. प्रतापराव पाटील चिखलीकर, माजी खासदार भास्करराव पाटील खतगावकर, माजी आमदार ओमप्रकाश पोकर्णा, प्रवीण पाटील चिखलीकर, दिलीपराव धर्माधिकारी, मुक्तेश्वर धोंडगे, माधव पावडे, बालाजीराव शिंदे, कन्हैया कदम, मोहसीन खान पठाण, नेताजी भोसले, पप्पू जाधव, माजी जि. प. सदस्य गणेशराव सावळे, शंकरराव कोंके, माणिकराव शिंदे आदींची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# जिल्हा पोलीस दलातील एक डीवायएसपी, पीआय आणि चार पोलीस उपनिरीक्षकांसह तीन अंमलदार सेवानिवृत्त

**नांदेड (प्रतिनिधी)**– येथील जिल्हा पोलीस दलातील नियत वयोमानानुसार एक पोलीस उपअधिक्षक, एक पोलीस निरीक्षक, चार पोलीस उपनिरीक्षक, एक सहाय्यक पोलीस उपनिरिक्षक आणि तीन पोलीस अंमलदार अशा दहा जण बुधवारी (दि.३०) सेवानिवृत्त झाले. त्या सर्वांचा पोलीस अधिक्षक अबिनाशकुमार यांनी सहकुटुंब सत्कार करून निरोप दिला.



माहुरचे पोलीस उपअधिक्षक दादाराव शिनगारे, किनवटचे पोलीस निरिक्षक सुनिल बिर्ला, पोलीस नियंत्रण कक्षातील पोलीस उपनिरीक्षक मारोती रावळे, सुर्यकांत कांबळे, पोलीस ठाणे इतवारा येथील ज्ञानोबा गिते, जीपीयुमधील राम गांजुरे, जिल्हा विशेष शाखेतील एएसआय शामसिंह ठाकूर, हदगाव येथील पोलीस अंमलदार खाकोबा चिंतले, पोलीस मुख्यालयातील शिवाजी वाठोडे, मांडवी येथील उकंडराव राठोड हे १० पोलीस सेवानिवृत्त झाले.

पोलीस अधिक्षक अबिनाशकुमार यांनी सर्व सेवानिवृत्तांना पुष्पगुच्छ, शाल, श्रीफळ देवून सर्व सेवानिवृत्तांचा कुटूंबासह सन्मान केला. भविष्यातील जीवनात तुमच्या अडचणींसाठी आम्ही सदैव तयार राहू असे सांगितले. याप्रसंगी पोलीस उपअधिक्षक मुख्यालय डॉ. अश्विनी जगताप, पोलीस कल्याण विभागाचे पोलीस निरिक्षक नामदेव रिठ्ठे यांच्यासह अनेक अधिकारी, पोलीस अंमलदार सेवानिवृत्तांचे कुटूंबिय मोठ्या संख्येने उपस्थित होते. महिला सहाय्य कक्षातील पोलीस उपनिरिक्षक स्नेहा पिंपरखेडे यांनी या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन केले. पोलीस अंमलदार सविता भिमलवाड यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले.

# सेवा हक्क दिन जिल्ह्यात उत्साहात साजरा

**नांदेड (प्रतिनिधी)**– सेवा हक्क दिवस तसेच महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम-२०१५ च्या दशकपूर्ती निमित्त जिल्हाभरात बुधवारी विविध कार्यक्रम घेण्यात आले.नागरिकांमध्ये अधिनियम, राज्यसेवा हक्क आयोगाबाबत तसेच आपले सरकार पोर्टल मार्फत ऑनलाईन उपलब्ध सेवाबाबत जनजागृती करण्यात आली.

उपजिल्हाधिकारी अजय शिंदे, जिल्हा परिषदेच्या उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) श्रीमती मंजुषा जाधव यांच्या उपस्थितीत विष्णुपुरी व बारड (ता. मुदखेड) येथील आपले सरकार सेवा केंद्राचे उद्घाटन करण्यात आले.

या कार्यक्रमास उपमुख्य कार्यकारी अधिकारी (मनरेगा) अमित राठोड, विस्तार अधिकारी (पं) आर.एन. दमकोंडवार, व्ही. बी. कांबळे, आर. पी. केंद्रे, सरपंच संध्याताई देशमुख, उपसरपंच अर्चना हंबर्डे, ग्राम पंचायत अधिकारी संजय कानोडे, संगणक परिचालक उग्रसेन हंबर्डे, कारकून संतोष हंबर्डे व ग्रामस्थ उपस्थित होते.

विष्णुपुरीचे ग्रामपंचायत अधिकारी संजय कानोडे, ग्रा. पं. बारड अनुप श्रीवास्तव, ग्रा. पं. माळकौठा संजय देशमुख, ग्रा. पं. उस्माननगर देवूबाई देशमुख, ग्रा.पं.लहानचे रवी क्षीरसागर यांना जिल्हाधिकारी कार्यालय येथे प्रशस्तीपत्र देवून सन्मान करण्यात आला.




**नांदेड** : भगवान श्री परशुराम जन्मोत्सवानिमित्त राजस्थानी विप्र समाज नांदेड, राजस्थानी विप्र महिला संघटन नांदेड आणि अखिल भारतीय विप्र ब्राम्हण युवा संघटनेच्यावतीने हनुमान मंदिर हनुमान टेकडी ते स्वामी समर्थ अन्न छत्र सोमेश कॉलनीपर्यंत शोभायात्रा काढण्यात आली. यावेळी अध्यक्ष रामकिशन दद्दू पुरोहित, चाणक्य ब्राम्हण महासभा महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष श्रीनिवास शिरू पांडे, उपाध्यक्ष शितल खांडील, घनश्याम गुडगिल्ला, बजरंग शुक्ला, नंदू जोशी, सोनू उपाध्याय, राजू शर्मा यांच्यासह समाज बाधंव, महिला मंडळ व युवक-युवती उपस्थित होते.

# समीराबागेत अनोळखी इसमाचा मृतदेह आढळला

**नांदेड (प्रतिनिधी)**– खडकपुरा, समीराबाग भागात ४५ वर्षीय अनोळखी इसम रेल्वेखाली आल्याने मरण पावला. सदर मयत हा अनोळखी असून त्याची ओळख पटविण्यासाठी शिवाजीनगर पोलिसांनी शोधपत्रिका जारी केली आहे.

बीट अंमलदार संजय सास्ते यांनी मृतदेहाचा पंचनामा करून मृतदेह शासकीय रुग्णालयात जमा केला. सदर मृतदेह रंग गोरा, चेहरा लांबट, बांधा सडपातळ, केस काळे पांढरे, उंची पाच फुट आठ इंच, पोशाख फिकट पिवळ्या रंगाचा लांब बाह्याचा लायनिंगचा शर्ट, काळ्या रंगाची नाईट पॅन्ट, नाक सरळ, डोळे अर्धवट बंद, उजव्या हाताच्या पोटरीवर टॅटू गोंदलेले आहे. अशा वर्णनाचा इसम कोणाचा नातेवाईक असल्यास शिवाजीनगर पोलिसांशी संपर्क साधावा असे आवाहन पोलीस निरीक्षक शिवाजी गुरमे यांनी केले आहे.

# सह्याद्री इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांचे स्कॉलरशिप परीक्षेत यश




**लोहा (प्रतिनिधी)**– सह्याद्री इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांनी पूर्व माध्यमिक व माध्यमिक स्कॉलरशिप परीक्षेमध्ये घवघवीत यश संपादन केले आहे

इयत्ता ५ वीतील अदिती फाजगे, मनसी शेटे, विशाल नीटुरे, शौर्य आंबेकर, चंद्रराज प्रवीण धुतमल, गणेश जाधव, आर्यन राठोड, श्रवण बिडवई, शिवानी सूर्यवंशी, शिवम देवशेटे हे विद्यार्थी पात्र झाले. सह्याद्री प्राथमिक ते उच्च माध्यमिक विद्यालय पारडी या शाळेचे कृष्णा काकडे, सिद्धी निधानकर, स्नेहा शिराळे व वर्ग ८ वी तुन गोविंद केंद्रे, साईराज नरंगले, संदेश राठोड, आदित्य गोंड हे विद्यार्थी पात्र ठरले आहेत.

साईकुमार दहिवाळ, सह्याद्री पब्लिक स्कूलचे मुख्याध्यापक अनिल जाधव, प्री-प्रायमरीच्या मुख्याध्यापिका रुक्मिणी धोंडगे व तसेच शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी स्कॉलरशिप परीक्षेमध्ये पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

# मागेल त्याला सौर कृषी पंप'; बनावट कॉलला बळी पडू नका

## महावितरणचे शेतकऱ्यांना आवाहन

**नांदेड (प्रतिनिधी)**– महावितरणतर्फे सर्वात आधी नोंदणी करणाऱ्यास प्राधान्याने सौर कृषी पंप बसविण्यात येत आहेत. पण प्रतीक्षा यादी बदलून पंप आधी बसवून देतो, असे आश्वासन देणारे काही बनावट कॉल शेतकऱ्यांना येत असल्याची तक्रार प्राप्त झाली आहे. शेतकऱ्यांनी अशा बनावट कॉल किंवा मेसेजला बळी पडू नये तसेच अशा कॉलनुसार कोणालाही पैसे देऊ नयेत, असे आवाहन महावितरणच्यावतीने करण्यात आले आहे.

मागेल त्याला सौर कृषी पंप या योजनेची संपूर्ण प्रक्रिया ऑनलाईन व पारदर्शक आहे. शेतकऱ्यांनी ज्या क्रमाने नोंदणी केली आहे. त्यानुसार पंप बसविण्यात येत आहेत. कोणालाही प्रतीक्षा यादी बदलून व इतरांना डावलून पंप देण्यात येत नाहीत. शेतकऱ्यांनी नोंदणी करताना आपल्या हिश्श्याची रक्कम भरल्यानंतर पंप बसविण्यासाठी नंतर कधीही पैसे भरण्याची गरज नाही. शेतकऱ्याने आपल्या हिश्श्याची रक्कम भरून पंप बसविणाऱ्या एजन्सीची निवड केली की त्या शेतकऱ्याचे नाव प्रतीक्षा यादीत समाविष्ट होते. यादीनुसारच पंप बसविण्यात येत आहेत.

मागेल त्याला सौर कृषी पंप योजनेत प्रतीक्षा यादी डावलून आधी पंप बसवून देतो, असे बनावट कॉल आले, तर शेतकऱ्यांनी त्याबाबत महावितरणच्या १८०० २३३ ३४३५ अथवा १८०० २१२ ३४३५ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधून तक्रार करावी. तसेच जवळच्या महावितरण कार्यालयातील अधिकाऱ्यांकडे संपर्क साधून शंका निरसन करता येईल.

### साहित्याची मागणी चुकीची

शेतात सौर कृषी पंप बसविताना काही ठिकाणी संबंधित एजन्सीकडून शेतकऱ्यांकडे वाहतूक खर्च अथवा अन्य साहित्याची मागणी झाल्याच्याही तक्रारी महावितरणकडे आल्या आहेत. परंतु सौर कृषी पंप बसविण्याबाबत संपूर्ण कामाची जबाबदारी संबंधित एजन्सीची असल्याने शेतकऱ्यांनी अशा प्रकारे साहित्याची मागणी झाल्यास त्याची दखल घेऊ नये व महावितरणकडे तक्रार करावी, असेही आवाहन करण्यात आले आहे.

# लहुजी साळवे सांस्कृतिक सभागृह येथे पेव्हर ब्लॉक कामांचा शुभारंभ

## जीवन पाटील घोगरे यांचा पुढाकार



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)** – जिल्हा नियोजन समितीचे माजी सदस्य जीवन पाटील घोगरे यांच्या पुढाकारातून हडको येथील लहुजी साळवे सांस्कृतिक सभागृह येथे पेव्हर ब्लॉकच्या कामाचा शुभारंभ करण्यात आला.

नगरसेवक प्रतिनिधी संजय पाटील घोगरे, नांदेड शहर राष्ट्रवादी महानगर अध्यक्ष जिवन पाटील घोगरे व मान्यवरांच्या उपस्थितीत २९ एप्रिल रोजी करण्यात आले. सुमारे दहा लाख रुपये खर्चून ही विकासकामे होत आहेत.

# नेरली येथे मोफत नेत्र तपासणी व उपचार शिबीर घेऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी

**नांदेड (प्रतिनिधी)**– नेरली (ता. नांदेड) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती मंगळवारी उत्साहात साजरी करण्यात आली. याच कार्यक्रमा दरम्यान निलावती आय हॉस्पिटल (फको सर्जरी सेंटर) च्या वतीने मोफत नेत्र तपासणी व उपचार शिबीर घेण्यात आले.

प्रारंभी तथागत गौतम बुद्ध व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. सरपंच दैवशला कोकरे यांच्या हस्ते पंचशील ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले. त्यानंतर सामुदायिक पंचशील, त्रिशरण ग्रहण करण्यात आले.

नांदेड शहरात डॉक्टर लेन परिसरात नव्यानेच सुरु झालेल्या निलावती आय हॉस्पिटलच्या वतीने मोफत नेत्र तपासणी व उपचार शिबीर घेण्यात आले. हॉस्पिटलच्या संचालिका डॉ. पौर्णिमा सावळे व त्यांच्या चमूने रुग्णांच्या डोळ्यांची तपासणी करून आवश्यक औषधी देवून उपचार केले.

आंबेडकरी चळवळीचे नेते प्रा. गौतम दुथडे यांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. नारायणराव येवले, चंद्रकांत ढगे व उत्तम सावळे यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.



यावेळी गुरू ऑप्टिकल्सचे बंडू मद्देवाड व त्यांच्या चमूनेही सहकार्य केले. सायंकाळी गावातून तथागत गौतम बुद्ध व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांची मिरवणूक काढण्यात आली. सकाळच्या सत्रात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनकार्यावर विचार मांडण्यात आले. जयंती सोहळा यशस्वी करण्यासाठी नवयुवक भीम जयंती मंडळाचे अध्यक्ष मारोती नरवाडे, सुभाष नरवाडे, माधव नरवाडे, बबलू जोंधळे, शिवानंद नरवाडे, सुरेश नरवाडे, प्रशीक नरवाडे मुंजाजी नरवाडे, रुक्मिणी कोकरे, संदीप सातोरे, प्रभाकर नरवाडे, गौतम सातोरे, गंगाधर नरवाडे, सुभाष नरवाडे आदींनी परिश्रम घेतले.

फॅशन | संसार | सौंदर्य

# सखी

# ऊन लागले तापू, केसांसाठी खास टिप्स जाणून घेऊ...

**उन्हाळा म्हणजे त्वचेची जास्त काळजी आणि त्याचबरोबर केसांचीही जास्त काळजी आणि निगा राखणं आलंच. आपले केस हे आपल्या व्यक्तिमत्वाचा एक महत्त्वाचा भाग आहेत. अगदी लांबसडक नसले तरी मऊ मुलायम आणि चमकदार केस हे चांगल्या आरोग्याचे लक्षण नक्कीच आहेत. पण अनेकदा दुर्लक्षामुळे केस खराब होतात.धूळ, प्रदूषण आणि त्यात उन्हाळ्यात येणाऱ्या घामामुळे केस निस्तेज आणि रुक्ष होतात. साहजिकच उन्हाळ्यात केसांची देखभाल करण्याची जास्त गरज असते. उन्हाळ्यात केसांची निगा कशी राखावी यासाठी काही खास टीप्स...**



- केस स्वच्छ ठेवा : उन्हाळ्यात घाम भरपूर येतो. त्याचबरोबर कोरडी हवा, धूळ, प्रदूषण यामुळे केस खूप घाण होतात. त्यामुळे उन्हाळ्यात केस स्वच्छ ठेवणं जास्त आवश्यक आहे. नियमित वर्कआऊट, व्यायाम करणाऱ्यांनी रोज केस धुतले पाहिजेत. केस धुतल्यानंतर ते ओलसर राहू न देता पूर्ण कोरडे करा. मोठे केस असतील तर एक दिवसाआड केस धुवावेत. मात्र रोजच्या रोज हार्ड शॅम्पूने केस धुणे टाळावे.
- केस धुण्याआधी तेल लावा : उन्हाळ्यात केस अगदी कोरडे, निस्तेज होतात. केस मऊ आणि हायड्रेट होण्यासाठी खोबऱ्याचं तेल सर्वोत्तम आहे. वर्षानुवर्षे आपल्याकडे केसांना खोबरेल तेल लावण्याची पध्दत आहे. तेल थोडेसे कोमट करुन लावल्यास त्याने अधिक फायदा होतो. नियमित तेल लावल्याने केसांना उत्तम पोषण मिळतेच. पण उन्हाळ्यात खोबरेल तेल लावल्याने केसांचा रुक्षपणा कमी होतो. तुम्ही केस धुण्याआधी एक तास खोबरेल तेल लावू शकता. रात्री झोपण्याआधी तेल लावून रात्रभर तसंच ठेवल्यास त्याचा चांगला परिणाम होतो. यामुळे केस अधिक मजबूत आणि दाट तसेच निरोगी बनतात.
- चांगला शॅम्पू आणि कंडिशनरचा वापर करा : उन्हाळा असो की हिवाळा, कोणताही ऋतू असला तरी केसांसाठी नेहमी चांगल्याच प्रतीचाच शॅम्पू आणि कंडिशनर वापरा. स्वस्त किंवा जाहिरातीत पाहून शॅम्पूची निवड करू नका. तुमच्या केसांसाठी योग्य असेल तोच शॅम्पू आणि कंडिशनर वापरा. केमिकलयुक्त शॅम्पूमुळे केस आणि त्याचबरोबर स्कॅल्पही कोरडा, रुक्ष होतो, त्यामुळे शक्यतो केमिकलमुक्त शॅम्पूच वापरावा. नैसर्गिक किंवा ऑर्गेनिक शॅम्पूचा वापर करणे योग्य.
- बाहेर जाताना केसांना रुमाल बांधा : उन्हाळ्यात कडक उन्हामुळे केस खराब होऊ शकतात. त्यामध्ये रुक्षता, रखरखीतपणा येतो. त्यामुळे उन्हाळ्याच्या दिवसांत अगदी सकाळी घराबाहेर पडणार असाल तरी डोक्याला स्कार्फ किंवा टोपी अवश्य घाला. हा रुमाल किंवा स्कार्फ कॉटनचाच वापरावा, कारण त्यामुळे डोक्याला थंडावा मिळतो आणि ऊन्हापासूनही संरक्षण होते. उन्हापासून केसांचं संरक्षण करण्यासाठी यूव्ही फिल्टर स्प्रे, जेल किंवा क्रिमचाही वापर करु शकता. यामुळे उन्हापासून केसांचा बचाव होईल.
- केसांसाठी योग्य डाएट : केस फक्त बाहेरुनच नाही तर आतूनही निरोगी असायला हवेत. त्यासाठी योग्य ते डाएट असणं गरजेचं आहे. मजबूत, दाट केसांसाठी आहारात प्रोटिन्स, व्हिटॅमिन्सचे योग्य प्रमाण असले पाहिजे. हिरव्या भाज्या, सोयाबीन, रताळे आणि ड्रायफ्रूट्सचा समावेश अवश्य आपल्या डाएटमध्ये करा. यामध्ये आयर्न, बीटा-कॅरोटीन, व्हिटॅमिन-ए आणि ओमेगा-३ असतं, ज्याचा केसांना खूप फायदा होतो. जास्त तेलकट, मसालेदार, जंक फूड खाण्याने केसांवरही त्याचा परिणाम होतो. त्यामुळे चौरस आणि योग्य आहार घेणं गरजेचं आहे. त्याचप्रमाणे उन्हाळ्यात मिळणारी फळे, भाज्या भरपूर खा. काकडी, खरबूज, कलिंगड, आंबा, संत्री यांचं शक्य तितक्या जास्त सेवन करा. तसेच शहाळे, कोकम सरबत, लिंबू सरबत अशी सरबतेही अवश्य घ्या. भरपूर पाणी मात्र नक्की प्या.
- केसांवर हॉट टूल्स वापरणं टाळा : अनेक जणींना केसांसाठी हेअर स्ट्रेटनर, ड्रायर वापरण्याची सवय असते किंवा त्यांच्या व्यवसायाचा भाग म्हणून ते वापरावं लागतं. पण अशा हॉट टूल्समुळे केस तुटतात, केसांचं अतोनात नुकसान होतं. केस अगदी निस्तेज आणि रुक्ष दिसू लागतात. त्यामुळे शक्यतो या हॉट टूल्सचा वापर करु नये. अगदी करावाच लागला तर रात्री झोपताना केसांना तेलाने मसाज करावा. केसांची वेणी घालून रात्रभर तशीच ठेवावी. सकाळी उठल्यावर केस चांगल्या शॅम्पूने स्वच्छ धुऊन टाकावेत.
- केसांना दर ३ महिन्यांमध्ये ट्रिम करा : दर तीन महिन्यांनी केस ट्रिम केल्यास केस अधिक चांगले वाढतात व दाट होतात. त्यामुळे केसांना स्प्लिट एंड्स होत नाहीत आणि केस दाट दिसतात. उन्हाळ्यात केस जास्त वेगाने वाढतात. रेग्युलर ट्रिमिंग केल्याने केसांचे आरोग्य चांगले राहते आणि व्हॉल्यूमही वाढतो.

### कोरफड जेलचा वापर

कोरफड त्वचेसाठी अत्यंत गुणकारी असते तशीच केसांसाठीही चांगली आहे. उन्हाळ्यात कोरफड लावल्यास थंडावा मिळतो. केसांना कोरफड जेल लावल्यास थंडावा तर मिळतोच पण केस चमकदार, मऊ होण्यासही मदत होते. केस धुण्याआधी अर्धा तास केसांना कोरफड लावून ठेवा. त्यानंतर साध्या पाण्याने केस धुऊन टाका. कोरफड जेल खोबरेल तेलात मिक्स करुन हेअर मास्क तयार करा. हा मास्क केसांना लावल्यास केस चमकदार होतात. केसांची नियमित निगा राखणे, तेलाचा मसाज, केसांची स्वच्छता या अगदी मुलभूत गोष्टी आहेत. या गोष्टी नियमितपणे केल्यास कोणत्याही अन्य हेअर ट्रीटमेंटची गरजच भासणार नाही आणि उन्हाळ्यातही केसही सुंदर, मुलायम, चमकदार दिसतील.

# पेस्टल रंगाच्या पेहरावामुळे लग्नात दिसाल उठून!

**लग्न असो अथवा कोणताही समारंभ, आपण स्टायलिश दिसण्यासाठी नक्कीच प्रयत्न करत असतो. मग ते कपडे असोत अथवा दागिन्यांची विविध फॅशन. सध्या ट्रेंडमध्ये नक्की काय चालू आहे याचा विचार करूनच आपण लग्नसमारंभात अथवा अन्य कार्यक्रमांना नटूनथटून, पेहराव करून जातो. लग्न म्हटलं की काही रंग डोक्यात अगदी फिक्स असतात. पण सध्या लग्नाच्या सीझनमध्ये वेगळं दिसण्यासाठी गडद रंगांची गरज भासत नाही. कारण सध्या ट्रेंडिंगमध्ये आहे ते म्हणजे पेस्टल कलर. लेटेस्ट ट्रेंडमध्ये पेस्टल रंगाची साडी, लेहंगा अथवा शराराची तुम्ही स्टाईल करून अधिक आकर्षक आणि वेगळे नक्कीच दिसू शकता. यासाठी काही युनिक आणि ट्रेंडिंग डिझाईन्सचा वापर करा आणि आम्ही दिलेल्या टिप्सचादेखील...**



## पीच पेस्टल साडी



साडी हा असा पेहराव आहे की, कोणत्याही समारंभामध्ये उठावदारच दिसतो. पण त्यातही लग्नामध्ये साडी नेसण्याचा ट्रेंड हा कधीही जुना होत नाही. पेस्टल रंगांमध्ये पीच पेस्टल साडी ही लग्नामध्ये तुम्ही नेसली तर ती अधिक आकर्षक आणि लक्षवेधी ठरते. पेस्टल रंगाची सिक्विन साडी असो अथवा चिकनकारी साडी असो तुम्ही ही स्टाईल नक्की ट्राय करू शकता. बाजारामध्ये साधारणतः २००० ते ३००० च्या किमतीत ही साडी तुम्हाला आरामात मिळते. त्यावर त्याला साजेसे दागिने घालून तुम्ही तुमचा लुक पूर्ण करू शकता. आता या साडीसह नक्की काय घालावे असा प्रश्न जर तुम्हाला मनात येत असेल तर या साडीसह तुम्ही मोत्यांचे दागिने घालून परफेक्ट लुक मिळवा. तसंच या स्टाईलची आणि पेस्टल रंगांची साडी प्लस साईज बॉडी टाईफ असल्यास अत्यंत सुंदर दिसते. त्यामुळे लग्नामध्ये एकदा या रंगाच्या साडीची फॅशन नक्की करून पाहा.

## ग्रीन पेस्टल लेहंगा

लेहंगा ट्रेंडही सध्या खूपच मुलींना आवडत आहे. ज्या मुलींना साडी सांभाळता येत नाही, त्यांच्यासाठी हा उत्तम पर्याय ठरतो. ग्रीन पेस्टल अथवा याच रंगांशी मिळताजुळता पेस्टल रंग तुम्ही लग्नासाठी लेहंगा घेताना निवडू शकता. साधारणतः ३००० ते ५००० च्या दरम्यान किमतीमध्ये लग्नासाठी बाजारात पेस्टल रंगाचा लेहंगा तुम्हाला मिळू शकतो. तुमचा खांदा ब्रॉड अर्थात थोडा मोठा असेल तर तुम्ही या लेहंग्यासह कुंदनचे दागिने घालू शकता. तसंच या पेहरावासह तुम्ही ग्लॉसी बेस मेकअप अथवा ओठांसाठी केवळ लिपग्लॉसचा वापर केल्यास, तुमचा लुक अधिक खास होतो. यावर भडक पद्धतीचा मेकअप न करता पेस्टल रंगांशी मिळताजुळता मेकअप करावा जेणेकरून तुमच्याकडे अधिक लोकांचे लक्ष जाईल.

## पेस्टल पिंक शरारा

शरारा अथवा घरारादेखील सध्या ट्रेंडमध्ये आहे. ज्यांना साडी नेसायला आवडत नाही अथवा लेहंग्यामध्ये पाय अडकण्याची शक्यता वाटते त्यांनी या स्टाईलचा पर्याय निवडावा. साधारणतः १५ ते २५ वयोगटातील मुलींना ही स्टाईल शोभून दिसते. नेट फॅब्रिकने तयार करण्यात आलेला असा पेस्टल पिंक शरारा लग्नामध्ये नक्कीच आकर्षक दिसतो. तसंच पेस्टल पिंक रंग हा कोणत्याही स्किन टोनवर उठावदार दिसतो. २००० ते ३००० च्या किमतीत हा शरारा सेट तुम्ही विकत घेऊ शकता. अशा पेस्टल पिंक शरारासह तुम्ही हेव्ही इअररिंग्ज मॅच करून घालावे. तुमच्याकडे जरकन स्टोनवर्कचे कानातले असतील तर अधिक सुंदर दिसतील. याशिवाय हलकीशी हेअरस्टाईल केल्यासदेखील तुमच्या लुकला परफेक्शन मिळते. यासाठी सहसा ओपन हेअर स्टाईलची तुम्ही निवड करा. असं केल्यामुळे तुमच्या सौंदर्याला एक वेगळाज साज मिळेल यात शंका नाही.

### पेस्टल रंगांची कशी कराल स्टाईल...

- प्रोफेशनल थीमसाठी तुम्ही पेस्टल रंगांसह लाल आणि निळ्या रंगाचे कॉम्बिनेशन ट्राय करा.
- गडद रंगासाठी अर्दी कलर थीम तुम्ही वापरू शकता, जिथे तुम्हाला अधिक कॉन्ट्रास्ट रंगसंगती करावी लागते. उदाहरणार्थ - प्लम आणि रेडीश ऑरेंज अशा रंगाचे कॉम्बिनेशन कपडे तुम्ही वापरू शकता.
- क्रिस्प आणि ड्रामेटिक कलर स्किमसाठी तुम्ही राखाडी टोन्ससह खाली ब्राईट कूलर ग्रीन शेड वापरा. कूलर ब्लू हा रंग अधिक आकर्षक दिसतो. तसंच पाण्याचा निळा रंगही पेस्टलमध्ये अधिक उठावदार दिसतो.
- नैसर्गिक ब्राऊन आणि लाईट हिरव्या रंगामध्येही तुम्ही साडी वा शरारा ट्राय करू शकता.
- आईस ब्लू या रंगासह राखाडी रंग हा अत्यंत रिफ्रेशिंग आणि डोळ्यांना सुखद वाटतो.
- बबलगम गुलाबी अर्थात बबलगम पिंक आणि टरकॉईज ह्यूज या रंगाचे कॉम्बिनेशन तुमचा मूड ताजातवाना ठेवायला अत्यंत उपयोगी ठरतो.
- तुम्हाला जर लेटेस्ट आऊटफिट, रंग आणि स्टाईल याविषयी जाण असेल तर तुम्ही त्या पद्धतीने आपली स्टाईल मॅच करून घ्या. पण लग्नासाठी तुम्ही सध्या ट्रेंडिंग असणारे असे रंग नक्की एकदा ट्राय करून पाहा.

# व्हाईट अन् आयव्हरी रंगाच्या साडीची फॅशन करताना...



**व्हाईट रंगामध्येही शेड्स असतात हे तुम्हाला माहीत आहे का ? हे वाचून तुम्हाला नक्कीच आश्चर्य वाटलं असेल. ऑफव्हाईट, चॉकव्हाईट अथवा आयव्हरी असा कोणताही रंग सध्या अधिक ट्रेंडमध्ये दिसून येतोय. खरं तर हे रंग वेस्टर्न कपड्यांपेक्षा साडी आणि इंडियन वेअरमध्ये अधिक दिसून येतात. काही वर्षांपूर्वी सफेद अथवा व्हाईट रंग घालणे चांगले मानले जात नसे. पण आता ही गोष्ट फारच जुनी झाली आहे आणि फॅशन स्वरूपात आणि फॅशन जगतात आता व्हाईट रंग अधिक चांगल्या पद्धतीने स्वीकारला जात आहे. हा हॉट ट्रेंड तुम्हालाही ट्राय करायचा असेल तर तुम्ही ही स्टाईल कॅरी करण्यासाठी कोणत्या टिप्स वापरायला हव्यात हे जाणून घ्या आणि दिसा अधिक आकर्षक!**



- मोनोटोन मॅजिक : व्हाईट अथवा आयवरी साडीची स्टाईल करण्यासाठी सर्वात सोपी, बेसिक आणि फुलप्रूफ पद्धत म्हणजे मोनोटोन अर्थात पूर्ण लुक एकाच रंगात करणे. डोक्यापासून पायापर्यंत एकसमान रंग ठेवणे. पांढऱ्या अथवा ऑफव्हाईट रंगाची साडी जर तुम्ही स्टाईल करणार असाल आणि ही साडी एम्ब्रॉईडेड असेल तर तुम्ही त्यासह एक व्हाईट थ्री क्वार्टर स्लीव्ह्ज ब्लाऊज घालावा. तसंच यावर दागिने अगदी भरभरून न घालता केवळ चांदीचे कानातले घालावेत. जेणेकरून साडीवर लक्ष हटणार नाही आणि तुमचा लुक अधिक उठावदार दिसून येईल. अशी साडी असेल तर गळ्यात भरजरी दागिने घालू नका आणि मोठे कानातले घाला.
- सिक्वेन व्हाईट साडीसह लुक : ऑल व्हाईट आयव्हरी लुक थोडा कंटाळवाटा दिसू शकतो असं जर तुम्हाला वाटत असेल तर तुम्ही सिक्वेन साडीची निवड करा. होलग्राफिक सिक्विन वर्कच्या साडीमुळे एक वेगळा आणि इंटरेस्टिंग लुक निर्माण होतो. तुम्हाला जर यासह मिसमॅच करायचे असेल तर तीदेखील तुमची आवड आहे. मात्र याचाही लुक तुम्ही मोनोटोन ठेवलात तर अधिक सुंदर दिसेल. सिक्विन साडी असेल तर तुम्हाला अधिक ग्लॅमरस आणि लक्षवेधी लुक मिळतो आणि सर्वांच्या नजरा तुमच्यावर खिळून राहतात.
- स्टेटमेंट ब्लाऊज : साडी अगदी साधी असेल तर त्यासाठी तुम्ही स्टेटमेंट ब्लाऊजचा वापर करू शकता. स्टेटमेंट म्हणजे अशा सफेद साडीसह तुम्ही मल्टीकलर ब्लाऊज अथवा गडद रंगाचा भरजरी ब्लाऊज वापरलात तर अधिक सुंदर दिसेल. तुम्हीदेखील जर प्लेन व्हाईट वापरणार असाल तर तुमचा ब्लाऊज हा अप्रतिम असायला हवा. या साडीसह तुम्ही कमीत कमी प्लॅटिनम दागिन्यांचा वापर करावा. हातात ब्रेसलेट, मोठे कानातले अथवा कानातले नसल्यास नाजूक डिझाईनचा नेकलेस तुम्ही वापरल्यास, हा लुक अधिक उठावदार आणि आकर्षक दिसतो.
- कलर पॉप : ऑल व्हाईट लुक बरेचदा कंटाळवाणा वाटू शकतो. त्यामुळे हा लुक अधिक उत्तम आणि आकर्षक करण्यासाठी तुम्ही थोडा कलर पॉप करण्याची गरज आहे. पण बरेचदा पांढऱ्या रंगासह नक्की कोणता रंग वापरावा हे अनेकांना कळत नाही. तर चुकीचा रंग निवडल्यास, लुकही खराब होतो आणि पांढऱ्या साडीवरून नजर हटू शकते. त्यामुळे कोणतीही जोखीम न घेता मोनोटनी लुक ब्रेक करून गडद लिपस्टिकचा वापर करू शकता. ही लिपस्टिक तुम्हाला वेगळाच लुक मिळवून देते.
- क्लासी लुक : साडीबरोबर सहसा ब्लाऊज हा खिशाला परवडतो पण वेगळा स्टेटमेंट ब्लाऊज असेल तर मात्र अगदी आपल्या जीवावर येतं कारण बजेट नसतं. पण तुमच्या खिशाला असा ब्लाऊज परवडणार असेल तर क्लासी लुक तुम्ही नक्कीच करू शकता. साडीसह मिसमॅच ब्लाऊज अधिक सुंदर दिसतो. त्यातही कॉटनची पांढरी साडी असेल तर तुम्ही कोणत्याही स्टाईलचा ब्लाऊज घातला तर तो अधिक स्टायलिश दिसतो. यासह तुम्ही साडी आणि ब्लाऊजप्रमाणे दागिने घाला आणि आपला लुक पूर्ण करा. तुम्हीही कोणत्या लग्नात अथवा समारंभाला जाण्यासाठी पांढऱ्या, आयव्हरी अथवा ऑफ-व्हाईट रंगाची निवड करत असाल तर या टिप्स नक्की लक्षात ठेवा.







# नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड

कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा व मलनिसारण विभाग यांचे कार्यालय मुख्य इमातर
पि.बी.एक्स : ०२४६२ : २३४७१०, २३४५७७, २३४४०४ फॅक्स : ०२४६२-२३२०७१,
E-Mail:nwmccorporation1@yahoo.in जा.क्र.नांवाशमनपा/पापुवजनि/१४७५/२०२५

## जाहीर प्रगटन

## अनाधिकृत नळ जोडणी अधिकृत करणे बाबत

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड हद्दीतील मालमत्ताधारकांना सुचित करण्यात येते की, नांदेड शहरामध्ये महानगरपालिके मार्फत नागरिकांना पाणी पुरवठा करण्यात येतो. काही मालमत्ताधारक नियमितपणे पाणीपट्टी मनपाकडे भरणा करतात, परंतु काही मालमत्ताधारक अनाधिकृतपणे पाणी वापर करीत असून अद्याप नळ असल्याची नोंदणी केली नसल्यामुळे अधिकृत नळ धारकांच्या पाणी पुरवठ्यावर परिणाम होता तसेच महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होत आहे, त्याकरीता याव्दारे जाहिर करण्यात येते की दि.०१.०५.२०२५ ते ३१.०५.२०२५ पर्यंत प्रचलित दरानुसार नळ जोडणी शुल्क पाणी पुरवठा विभाग, मुख्य कार्यालय, नांवाशमनपा, नांदेड येथे भरणा करुन नळ जोडणी अधिकृत करुन घेण्या बाबत सुचित करण्यात येत आहे. नागरीकांनी अनाधिकृत नळ जोडणी अधिकृत करण्यासाठी दिनांक ३१.०५.२०२५ पर्यंत अनधिकृत नळ जोडणी अधिकृत करुन घ्यावी, यानंतर विशेष पथकाच्या तपासणीत अनाधिकृत नळ जोडणी आढळून आल्यास अनाधिकृत नळ धारकांवर सार्वजनिक संपतीस हानी प्रतिबंध अधिनियम १९८४ कलम (३) अन्वये गुन्हे दाखल करण्यात येतील याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

(!! पाणी हेच जीवन आहे त्याचा योग्य वापर करुन पाण्याचा अपव्यय टाळावा !!)

**आयुक्त तथा प्रशासक,**
**नांदेड वाघाळा शहर महानगपालिका, नांदेड**

---

पवित्र पोर्टल व्दारे शिक्षक भरती टप्पा - २
संस्थेचे नाव- गुरूदेव शिक्षण संस्था मुखेड
ता. मुखेड जि. नांदेड संस्थाकोड - २७१५०६च्च००६

## पाहिजे

गुरूदेव शिक्षण संस्था मुखेड ता. मुखेड जि. नांदेड या व्यवस्थापनाच्या गुरूदेव विद्या मंदरि माध्यमिक शाळा या १०० टक्के अनुदानित शाळेमध्ये शासनाने शिक्षक भरतीसाठी प्राधान्यक्रम दिलेल्या पवित्र पोर्टल २०२४ मार्फत शिक्षण सेवक भरती करण्यासाठी जाहिरात देत आहोत. खालील नमुद केलेल्या पदासाठी आवश्यक शैक्षणिक व व्यावसायीक अर्हता धारक असलेल्या व पवित्र प्रणालीमध्ये नोंदणी केलेल्या पात्र उमेदवाराकडुन ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येते आहे.

| अ.क्र. | वर्ग | पद | विषय | शैणिक पात्रता | माध्यम | मानधन | पद संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ८ वी | शिक्षण सेवक | गणित | बी.एस.सी बी.एड | इंग्रजी | १६०००/- | १ |
| २ | ८ वी | शिक्षण सेवक | मराठी | बी.ए. बी.एड | मराठी | १६०००/- | १ |

**वरील पदाचे आरक्षण एसटी- १,व्हीजे -१ या प्रमाणे असेल**

**टीप-** वरील रिक्त पदासाठी पवित्र प्रणालीमार्फत शासना कडुन उमेदवाराची नावे कळविले जाणार आहेत. त्यामुळे प्रत्यक्ष संस्थेकडे कोणीही अर्ज करू नये.

**स्वाक्षरी**

**मुख्याध्यापक**
**गुरूदेव विद्यामंदीर माध्यमिक मुखेड**
**ता.मुखेड जि.नांदेड**

**सचिव**
**गुरूदेव शिक्षण संस्था शिवाजीनगर मुखेड**
**ता.मुखेड जि.नांदेड**

---

## पवित्र प्रणालीद्वारे शिक्षक भरती जाहिरात (टप्पा-२)

मान्य दिनांक : 01/04/2025
प्रसिद्धी दिनांक :

संस्थेचे नाव : (271513SC023) saraswati Vidhyabhavan shiksan Sanstha Sawargaon Mal. Tq Hadgaon Dist. Nanded (Secondry / Higher Secondary) - With Interview

saraswati Vidhyabhavan shiksan Sanstha Sawargaon Mal. Tq Hadgaon Dist. Nanded या व्यवस्थापनच्या शाळेमध्ये खाली नमूद केलेल्या पदासाठी आवश्यक शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता धारण करीत असलेल्या व पवित्र प्रणालीमध्ये नोंदणी केलेल्या पात्र उमेदवारांकडून ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागवण्यात येत आहेत.

| शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता, विषय व पदनिहाय रिक्त पदांचा तपशील | | | | | | | | मान्य दिनांक 01/04/2025 | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ. क्र. | माध्यम | पद | वेतन श्रेणी / मानधन | अनुदान प्रकार | विषय | शिकवण्याचे माध्यम | आवश्यक शैक्षणिक पात्रता | आवश्यक व्यावसायिक पात्रता | TET/ CET | एकुण पदे |
| 1 | Marathi | Graduate Teacher Std (9-10) | Consolidated Pay-GT 9-10 (18000) | Aided | Language (English) | -- | Graduation | Graduation | - | 01 |
| | | | | | | | | Total | | 01 |

**सर्वसाधारण सूचना** :

1. अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी-2022 (TAIT) प्रविष्ट झालेल्या उमेदवारांपैकी ज्या उमेदवारांनी पवित्र प्रणाली (https://tait2022.mahateacherrecruitment.org.in) या संकेतस्थळावर वैयक्तिक माहिती नोंदवून स्वप्रमाणित केलेली आहे, असेच उमेदवार जाहिरातीनुसार ऑनलाईन अर्ज करू शकतील.
2. शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता व अध्यापनाचे विषय, वयोमर्यादा, आरक्षण, अन्य पात्रता व आवश्यक कागदपत्रे इत्यादी साठी सर्वसाधारण सूचना सविस्तर तपशिलासह https://tait2022.mahateacherrecruitment.org.in या संकेतस्थळावर पवित्र प्रणालीमध्ये " उमेदवारांसाठी सर्वसाधारण सूचना" या शीर्षाखाली उपलब्ध आहेत. सदर सूचना व सूचनांमध्ये नमूद आवश्यक शासन निर्णय यांचे अवलोकन करून स्वत:ची खात्री करूनच ऑनलाईन अर्ज करावेत.

मुख्याध्यापक अध्यक्ष / सचिव

---

**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता**
**सार्वजनिक बांधकाम विभाग,देगलुर**
**ई –निवीदा सुचना क्रमांक 02 सन 2025-2026**

कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग,देगलुर जिल्हा नांदेड (दुरध्वनी क्रमांक 02463-255111) हे महाराष्ट्र शासनच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या प्रवर्गातील नोंदणीकृत कंत्राटदाराकडुन ब-1 निवीदा प्रणालीव्दारे मागवित आहेत सदर निविदामध्ये ( 25 ) कामे समाविष्ट असुन या निवीदे अतंर्गत सुंपर्ण माहिती www.maphapwd.gov.in http://www.paytopwd.com या संकेतस्थळावर आवश्यक निविदा शुल्क भुरुन माहिती व खेरदी (Downlod) करण्याचा कालवधी दिनांक **06.05.2025** ते **13.05.2025**पर्यत आहे.

मोहरबंद निविदा स्विकृतीचा दिनांक **15.05.2025** रोजी सार्वजनिक बांधकाम विभाग, देगलुर येथे **14.00** वाजे पर्यत.

उपरोक्त एकत्रीत कामांची निवीदा किंमत रुपये 1.00 कोटी पेक्षा कमी आहेत.

टिप :- निवीदा कोणतेही कारण न दर्शविता कोणत्या ही स्तरावर रद्द करणे अथवा स्विकारण्याचा अधिकार सक्षम अधिकाऱ्यांनी राखुन ठेवला आहे.

13
दिमाका/लातूर/ज.हि.क्र......./२०२५-२०२६

कार्यकारी अभियंता
सार्वजनिक बांधकाम विभाग,देगलुर
जि.नांदेड

---

## Change In Name

My old name is DHANJE SANGITA DATTATRAYRAO . I AM changing AS New Name. SANGEETA PRADEEP HUSSEKAR Hence forth her all correspondence will be done As per her new Neme please consider the same. ADD-W/O PRADEEP HUSSEKAR NEAR HANUMAN MANDIR NANDED HOUSING SOCIETY VIJAY NAGAR NANDED 431602

---

## जाहीर प्रगटन

मा.श्रीमती बी.एम.एन.देशमुख २ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर नांदेड यांच्या न्यायालयात किरकोळ अर्ज क्र. ७१२/२०२५

अर्जदार-१.शारदा नरसय्या रागेला वय ५५ वर्षे धंदा घरकाम २.रेणुका व्यंकटेश बेटेराज वय ३६ वर्षे धंदा घराकम रा.भोसीकर गल्ली बिलोली ता.बिलोली जि.नांदेड ३.सुनिल नरसय्या रागेला वय ३५ वर्षे धंदा मजुरी ४.अनिल नरसय्या रागेला वय ३५ वर्षे धंदा मजुरी सर्व १ ३ व ४ रा.दिलीपसिंग कॉलनी वजीराबाद नांदेड

विरूद्ध

गैरअर्जदार-निरंक

दावा-बॉम्बे रेग्यूलशन ॲक्ट १८२७ च्या कलम २ व ३ प्रमाणे वारसा हक्क प्रमाणप पत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदाराने या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र अर्ज केला आहे. त्याअर्थी अर्जदार मयत नरसय्या भूमय्या रागेला यांचे वारस आहेत.मयत नरसय्या भूमय्या रागेला यांचा मृत्यू दिनांक २८/१२/२०१५ रोजी झाला. अर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस आहेत.अर्जदाराशिवाय कोणीही मयताचे वारस नाहीत.अर्जदार यानी मान्यवर न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळणेसाठी अर्ज केला आहे.तरी प्रस्तुत प्रकरणी अर्जदार यांच्या नावे वारसा प्रमाणप देण्यास कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी स्वत न्यायालयात दिनांक १२/६/२०२५ रोजी किंवा तत्पुर्वी नोंदवावा.मुदतीनंतर येणाऱ्या आक्षेपाचा विचार करण्यात येणार नाही.व अर्जांची पुढील सुनावणी करण्यात येईल

आज दिनांक ३०/४/२०२५ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले

**आदेशावरून**

**क. लिपीक** **सहाय्यक अधिक्षक**
**सह दिवाणी न्यायालय क.स्तर नांदेड**

---

## जाहीर प्रगटन

नांदेड येथील ८ वे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर नांदेड यांच्या न्यायालयात समक्ष श्री.नागेश वि.पवार किरकोळ अर्ज क्र. ७११/२०२५
बजरंग व इतर वि.निरंक

अर्जदार-१.बजरंग पि.नारायण परडे वय ५० वर्षे धंदा मजुरी २.कैलास पि.नारायण परडे वय ४९ वर्षे धंदा मजुरी ३.किशोर पि.नारायण परडे वय ४८ वर्षे धंदा मजुरी सर्व रा.गोवर्धन घाट दिलीपसिंघ कॉलनी वजीराबाद नांदेड

विरूद्ध

गैरअर्जदार-निरंक

दावा- वारसा प्रमाणप पत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदाराने या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे.वरील अर्जदार मयत नारायण घनश्याम परडे यांचे वारस आहेत.मयत नारायण घनश्याम परडे यांचा मृत्यू दिनांक १७/४/२०२२ रोजी झाला.अर्जदारांने अर्जात नमुद केले आहे की, अर्जदार क्र.१ ते ३ हि मयताची मुले आहेत. वर नमुद अर्जदाराशिवाय इतर कोणीही मयताचे कायदेशीर वारस नाहीत.

तरी प्रस्तुत प्रकरणी अर्जदाराच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी तो स्वत हजर राहून न्यायालयात दिनांक १०/६/२०२५ रोजी एक महिन्याच्या आत नोंदवावा मुदतीनंतर येणाऱ्या आक्षेपाचा विचार करण्यात येणार नाही.व अर्जाची पुढील सुनावणी करण्यात येईल आज दिनांक २९ /४/२०२५ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले

**आदेशावरून**

**क. लिपीक** **सहाय्यक अधिक्षक**
**८ वे सह दिवाणी न्यायालय क.स्तर नांदेड**

स्थलांतर
सिटी मॅक्स डिजिटल कलर
मो.7058766021,9422185282
गड्डम मार्केट,पहिला मजला,
शिवाजी नगर,नांदेड

# गोदातीर समाचार

पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस
हर्बल ट्रिटमेंट
१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...
किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकूण, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.
पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308





**नांदेड** : जगत्ज्योती महात्मा बसवेश्वर यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. पहिल्या छायाचित्रात शहर व जिल्हा काँग्रेस कमिटीच्यावतीने खा. रविंद्र चव्हाण, जिल्हाध्यक्ष बी.आर. कदम, जिल्हाध्यक्ष अब्दुल सत्तार, सुरेश गायकवाड, आनंद चव्हाण, माजी सभापती संजय बेळगे, केदार पाटील साळुंके, विठ्ठल पावडे, शिवाजी पाटील, महेश देशमुख, सत्यपाल सावंत, करूणा जमदाडे, बालाजी चव्हाण, दीपसिंघ हजुरीया, संजय वाघमारे, गगन यादव, गंगाधर सोनकांबळे, उद्धव लांडगे आदी दिसत आहेत. दुसऱ्या छायाचित्रात शिवसेनेच्यावतीने आ. बालाजी कल्याणकर, शिवाचार्य काशिनाथ महाराज पाथरीकर, जिल्हाप्रमुख गंगाधर बडूरे, राजू गुंडावार, शहरप्रमुख तुलजेश यादव, उमेश दिघे, शहाजी आढाव, गिरीश नारखेडे, महादेवी मठपती, श्याम बंग, राजेश चव्हाण यांनी महात्मा बसवेश्वर यांना अभिवादन केले. तिसऱ्या छायाचित्रात आ. आनंद पाटील बोंढारकर, जिल्हाप्रमुख विनय गिरडे, तालुकाप्रमुख उद्धव शिंदे, शहरप्रमुख सुहास खराणे, सचिन पवार, शंकर पिनोजी, गजेंद्रसिंह ठाकूर, पप्पू गायकवाड, रवी थोरात यांनीही महात्मा बसवेश्वर यांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. (छाया : ज्ञानेश्वर सुनेगावकर, करणसिंह बैस)

## मनपा आयुक्तांकडून शहर वाहतूक नियोजनाचा आढावा

### महापालिकेत वाहतूक नियोजनासाठी स्वतंत्र कक्षाची स्थापना

**नांदेड (प्रतिनिधी)** – मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांनी महापालिका हद्दीत शहरातील वाहतूक व्यवस्था सुधारण्यासंदर्भात बुधवारी (दि.३० एप्रिल) महापालिकेत आयोजित बैठकीत आढावा घेतला. तसेच नांदेड शहरातील वाहतूक समस्या सोडविण्यासाठी उपआयुक्त संवर्गातील अधिकाऱ्याच्या नियंत्रणाखाली म हापालिकेत स्वतंत्र वाहतुक नियोजन कक्ष स्थापन करण्यात आला आहे. या कक्षामध्ये १ उपअभियंता, ४ कनिष्ठ अभियंता व २ लिपीक वर्गीय कर्मचाऱ्यांची नियुक्ती मनपा आयुक्तांनी केली आहे.

या आढावा बैठकीत महापालिका परिक्षेत्रातील अपघात रोखण्यासाठी मनपा हद्दीतील ११ रस्त्यांवर आवश्यकतेनुसार दिशा दर्शक फलक, गतीरोधक पट्टी, झेब्रा क्रॉसिंग इत्यादी उपाययोजना करण्यात आल्याची माहिती देण्यात आली. तसेच शहरातील ऑटो रिक्षा थांबेसाठी महापालिकेने एकुण ८८ ठिकाणी फलक लावण्यात आल्याचे यावेळी सांगण्यात आले. त्याचप्रमाणे प्रादेशिक परिवहन विभाग व शहर वाहतूक शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने सर्वे करुन वाढीव ऑटो रिक्षा थांबेच्या संदर्भात तात्काळ कार्यवाही करण्याचे निर्देश यावेळी आयुक्तांनी दिले आहेत.

तसेच रस्ता सुरक्षा समितीच्या बैठकीत जिल्हाधिकारी यांनी सुचित केल्यानुसार शहरातील वाहतुक सुरळीत होण्याच्या दृष्टीकोणातुन आय.टी. आय. चौक ते वजिराबाद चौक वरील रस्त्यांच्या दोन्ही बाजुचे सायकल ट्रकचे बांधकाम काढून रस्ता रुंद करण्यात आल्याचे यावेळी सांगण्यात आले. तसेच शहरातील स्कुल बस थांबेसाठी एकुण ९० ठिकाणी फलक बसविण्यात आल्याचे सांगण्यात आले. त्याचप्रमाणे विविध चौकात डाव्या बाजुच्या सुरक्षित वाहतुकीसाठी रस्ता दुरुस्ती, झेब्रा क्रॉसिंग व इतर आवश्यक उपाययोजना करण्याच्या दृष्टीकोणातून महानगरपालिकेने आय.टी. आय. चौक येथील फ्री-लेफ्टचे काम प्राधान्याने पूर्ण केले. झेब्रा क्रॉसिंगचे व नाईक चौकाचे काम प्रगतीपथावर आहे. शहरात वने-वे व नो-ऐंट्रीचे एकुण १० ठिकाणी फलक लावण्यात आल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

या बैठकीत शहरातील वाहतूक उपाययोजना संदर्भात केंद्रीय सडक अनुसंधान संस्थान, नवी दिल्ली यांच्याकडून प्राप्त झालेल्या पत्राच्या अनुषंगाने लवकरच करारनामा करून सर्वेक्षण व सविस्तर प्रकल्प आराखडा तयार करण्यात येत आहे. सिटी बस थांबेच्या जागांसाठी जिल्हाधिकारी कार्यालय व महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळास समन्वय साधून योग्य कार्यवाही करण्याचे निर्देश यावेळी देण्यात आले.

शहरातील वाहतुक सोडविण्यासाठी प्रामुख्याने साप्ताहीक बाजार स्थलांतर, पार्कंग स्थळ निश्चिती, पंक्चर स्पॉट शोधणे, शिवाजी नगर व डॉ. लेन भागात मनपाच्या मोकळ्या जागेत पे अँड पार्क सुविधा निर्माण करणे व शहरातील हॉकर्स झोन, पार्किंग व नो-पार्किंग झोनबाबत अंमबजावणी करण्याठी म नपा आयुक्तांनी आदेश दिले.

सदरील बैठकीस महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम यांच्यासह उपआयुक्त अजितपालसिंघ संधु, सहायक संचालक नगररचनाकार पवन आलुरकर, शहर अभियंता सुमंत पाटील, उपअभियंता अरुण शिंदे, कनिष्ठ अभियंता संदिप पाटील, किरण सुर्यवंशी, व्ही. जी. गोकुळे व राजकुमार बोडके यांची उपस्थिती होती.

## बेकायदा नळजोडणी देणाऱ्या प्लंबरचा परवाना निलंबित

### ३१ मे पर्यंत नळ जोडणी अधिकृत करून घेण्याचे आवाहन

**नांदेड (प्रतिनिधी)**– नळ जोडणी अधिकृत करुन घेण्याची विशेष योजना महानगरपालिकेने सुरु केली आहे. या योजने अंतर्गत ३१ मे पर्यंत नळ जोडणी अधिकृत करुन घेता येणार आहे.

महानगरपालिकेच्या हद्दीतील शहरातील चौफाळा ते बिलाल नगर रस्त्यावर एकुण १७ नागरीकांनी अनधिकृतपणे नळ जोडणी घेतली आहे. महानगरपालिकेने संबंधीत नळधारकांवर सार्वजनिक संपत्तीचे नुकसान प्रतिबंधक अधिनियमानुसार इतवारा पोलीस स्टेशन येथे दि.२५ मे रोजी गुन्हा दाखल केला असून प्लंबर संदिप गंगाधर सोनटक्के यांचा प्लंबर परवाना निलंबित करण्याचे आदेश महापालिकेच्या वतीने निर्गमीत करण्यात आले आहेत.

या कारवाईमुळे शहरात अनधिकृत नळ जोडणी घेणाऱ्या नागरीकांचे व गैरमार्गाने नळ जोडणी देणाऱ्या प्लंबरचे धाबे दणाणले आहेत.

या विशेष योजनेचा लाभ घेऊन प्रचलित शुल्क भरुण नळ जोडणी अधिकृत करुन घेऊन गुन्हा दाखल होण्यासारखी अप्रिय घटना टाळावी, असे आवाहन मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांनी केले आहे.



**नांदेड** : जगत्ज्योती महात्मा बसवेश्वर यांच्या जयंतीनिमित्त शिवा अखिल भारतीय युवक संघटनेच्यावतीने शहरातील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते महात्मा बसवेश्वर पुतळ्यापर्यंत मिरवणूक काढण्यात आली. यावेळी महिला, पुरूषांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. (छाया : करणसिंह बैस)

## जिल्हा युवा पुरस्कार जाहिर

**नांदेड (प्रतिनिधी)**– जिल्ह्यातील युवक, युवती तसेच नोंदणीकृत संस्थांकडून जिल्हा युवा पुरस्कार सन २०२४-२५ साठी अर्ज मागविण्यात आले होते. त्यानुषंगाने प्राप्त प्रस्तावाची जिल्हास्तर युवा निवड समितीच्या वतीने छाणणी करुन अंतिम पुरस्कारार्थींची नांवे पुढीलप्रमाणे आहेत.

सन २०२४-२५ (युवक) करीता संदिप हरीभाऊ कळासरे यांची जिल्हास्तर युवा पुरस्कार निवड समितीमार्फत निवड करण्यांत आली असून या पुरस्काराचे स्वरुप १० हजार रोख, सन्मानचिन्ह, गौरवपत्र, शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ असुन हा पुरस्कार १ मेच्या मुख्य ध्वजारोहण कार्यक्रमात प्रदान करण्यात येणार आहे. या प्रसंगी शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार सन २०२२-२३ चा आंतरराष्ट्रीय बॉक्सींग खेळाडू अजय माधव पेंदोर रा. किनवट व सन २०२३-२४ चा पॅरा ऑलम्पिक आंतरराष्ट्रीय बॅडमिंटन खेळाडू लताताई परमेश्वर उमरेकर यांना महाराष्ट्र दिनी मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात येणार आहे.

त्याकरीता जिल्ह्यातील शिवछत्रपती क्रीडा पुरस्कारार्थी, राज्य क्रीडा पुरस्कारार्थी, विविध एकविध खेळ संघटनेचे पदाधिकारी, खेळाडू मुले-मुली, प्रशिक्षक व क्रीडाप्रेमी यांनी गुरुवारी दि.१ मे रोजी वेळ सकाळी ८ वाजता पोलीस परेड मैदान, वजिराबाद, नांदेड येथे मोठया संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी जयकुमार टेंभरे यांनी केले आहे.

## 'कंपोस्ट खड्डा भरु, आपलं गाव स्वच्छ ठेवू' मोहिमेला आजपासून जिल्हयात सुरुवात

**नांदेड (प्रतिनिधी)**– जिल्ह्यातील गावे स्वच्छ, सुंदर होण्यासाठी 'कंपोस्ट खड्डा भरू, आपलं गाव स्वच्छ ठेवू' हे अभियान गुरुवारपासून सुरु होत आहे. या अभियानात गाव स्तरावर शासकीय निमशासकीय कर्मचारी, महाविद्यालय विद्यार्थी, विविध सेवाभावी संस्था, बचत गट व मोठ्या संख्येने ग्रामस्थांनी सहभाग नोंदवून जिल्ह्यात हे अभियान यशस्वी करावे, असे आवाहन पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील, पालकमंत्री अतुल सावे यांनी केले आहे.

या उपक्रमाच्या माध्यमातून गावोगावी सेंद्रीयखत निर्मिती सुलभ होणार असून पर्यावरणपूरक घनकचरा व्यवस्थापन प्रणालीस चालना मिळेल, कचऱ्याचा पुनर्वापर खत निर्मिती आणि शाश्वत स्वच्छतेच्या दृष्टीने ही मोहीम महत्वपूर्ण ठरणार आहे.

गावातच सेंद्रीयखत तयार व्हावे कचऱ्यावर उपाययोजना आणि जनतेमध्ये स्वच्छतेविषयी जागरूकता निर्माण व्हावी, हीच या अभियानाची मुख्य संकल्पना असून या अभियानात जिल्हयातील सर्व गावांनी सहभाग घ्यावा असे आवाहन पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील, पालकमंत्री अतुल सावे, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले व मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांनी केले आहे.

## मंत्री नरहरी झिरवाळ यांचा दौरा

**नांदेड (प्रतिनिधी)**– राज्याचे अन्न व औषध प्रशासन, विशेष सहाय्य मंत्री नरहरी झिरवाळ हे १ मे रोजी नांदेड दौऱ्यावर येत असून त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे राहील.

गुरुवार १ मे २०२५ रोजी हिंगोली येथून सकाळी ११ वाजता नांदेड विमानतळाकडे प्रयाण करून दुपारी १२ वाजता नांदेड विमानतळ येथे आगमन व विशेष विमानाने मुंबईकडे प्रयाण करतील.

## मंत्री दत्तात्रय भरणे यांचा दौरा

**नांदेड (प्रतिनिधी)**– राज्याचे क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्यांक विकास व औकाफ मंत्री दत्तात्रय भरणे हे १ मे रोजी नांदेड दौऱ्यावर येत असून त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे राहील. गुरुवार १ मे २०२५ रोजी वाशिम येथून सकाळी ९ वा. मोटारीने नांदेड विमानतळाकडे प्रयाण करतील. सकाळी ११ वा. नांदेड विमानतळ येथे आगमन व खाजगी विमानाने मुंबईकडे प्रयाण करणार आहेत.

## पोलीस अधीक्षक कार्यालयात महात्मा बसवेश्वर व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जयंती साजरी



**नांदेड (प्रतिनिधी)**– येथील पोलीस अधीक्षक कार्यालयात बुधवार दि. ३० एप्रिल रोजी महात्मा बसवेश्वर व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज या महापुरूषांची जयंती साजरी करण्यात आली.

पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या हस्ते महापुरूषांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या प्रसंगी जनसंपर्क अधिकारी तथा पोलीस उपनिरीक्षक जे. ई. गायकवाड यांच्यासह पोलीस अधीक्षक कार्यालयातील सर्व विभागाचे पोलीस अधिकारी, अंमलदार आणि मंत्रालयीन कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित राहून ममहात्मा बसवेश्वरफव मराष्ट्रसंत तुकडोजी महाराज या महापुरूषांना अभिवादन केले.

सदर कार्यक्रमाचे आयोजन हवालदार संजय सांगवीकर, अंमलदार विनोद भंडारे यांनी चांगल्या प्रकारे केले आहे.




**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com